www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार

मराठी

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापूर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक – सौ भारती संतोष आमले उपसंपादक – श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक – श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक – श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ | अंक : 274 | वा गुरुवार दि. 19 जून २०२५ | किंमत : 2 रु | पृष्ठ : ४

## दृष्य सत्य

### जनतेच्या नजरेतून
शासनाच्या दरबारात

### तळोजा फेज 1, सेक्टर 14, प्लॉट नं. 112
हॉस्पिटल व लोकवस्तीतच वाढला कचरा आणि सांडपाणी!




फोटोतून आवाज शासन दरबारी पोहोचवत आहेत

मुकुंद कांबळे,
सहसंपादक, दैनिक आधार

मागणी त्वरित सफाई गटारींची दुरुस्ती फवारणी आणि जनजागृती

"स्वच्छता मोहिम फक्त कागदावर – प्रत्यक्षात दुर्गंधी, आजार आणि दुर्लक्ष!"
"मुलं, वृद्ध, सर्वांच्या आरोग्याला धोका – जबाबदार कोण?"

# आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धा' ; २३ जूनपासून होणार भव्य सुरुवात

### १६ शाळांमधील सुमारे १३ हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**


विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, वक्तृत्व कौशल्य आणि नेतृत्वगुणांची जोपासना व्हावी या हेतूने 'आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धा' २३ जूनपासून भव्य स्वरूपात सुरू होणार आहे. कोशिश फाउंडेशनचे अध्यक्ष परेश ठाकूर यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा दरवर्षी प्रमाणे यंदाही आयोजित केली आहे. यावर्षी स्पर्धेचे हे तिसरे वर्ष असून, ही स्पर्धा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक महत्वपूर्ण व्यासपीठ ठरले आहे. हि स्पर्धा वर्ग अंतर्गत फेरी, शाळा अंतर्गत




फेरी आणि शालेय अंतिम फेरी होणार असून निवडक ६०० स्पर्धकांमधून अंतिम ६० विजेते ठरणार आहेत. मागील वर्षी प्रमाणे यंदाच्या वर्षीही तितक्याच उत्साहात स्पर्धा पार पडणार आहे. १६ शाळांमधून सुमारे १३ हजार विद्यार्थी सहभाग घेणार आहेत आणि त्या अनुषंगाने नियोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूल कामोठे, लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल कामोठे, चांगू काना ठाकूर विद्यालय (इंग्रजी माध्यम) नवीन पनवेल, चांगू काना ठाकूर विद्यालय (मराठी माध्यम) नवीन पनवेल, सुषमा पाटील विद्यालय कामोठे, लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय कामोठे, तसेच पनवेल महानगरपालिकेच्या १० प्राथमिक शाळांचा सहभाग असणार आहे. या स्पर्धेत एकूण ५ हजार बक्षिसे असून १४०० पदके, ४०० ट्रॉफी, तसेच ६० चॅम्पियन ट्रॉफी असणार आहेत. अधिक माहितीसाठी ७५०२१००१०० या क्रमांकावर संपर्क करावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. कोट – " प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतःला उत्कृष्ट पद्धतीने व्यक्त करता यावे, हीच आमची भावना आहे. वक्तृत्व स्पर्धा ही आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण वाढवण्यासाठी प्रभावी साधन आहे." त्यामुळे यंदाही 'आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. – परेश ठाकूर – अध्यक्ष कोशिश फाउंडेशन

## *लोकनेते मा. मंत्री कै. माणिकरावजी (दादा) पालोदकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर व केशर आंबा फळ रोपं वाटपाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**



**सिल्लोड** : – राजकारणाच्या पल्याड जाऊन समाजमन जोपासणारे दूरदृष्टी नेतृत्व, शिक्षण व सहकार महर्षी, कर्तुत्व आणि दातृत्व यांचा सहज सरळ मिलाफ असणारे सर्वसामान्यचे सर्वमान्य नेतृत्व लोकनेते व मा. मंत्री कै. माणिकरावजी (दादा) पालोदकर यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त प्राथमिक आरोग्य केंद्र पालोद येथे रक्त संकलन– दत्ताजी भाले रक्त केंद्र, डॉ. हेगडेवार रुग्णालय, गारखेडा परिसर छत्रपती संभाजी नगर यांच्या सहकार्याने भव्य अशा रक्तदान शिबिराचे व केशर आंबा फळ रोप वाटपाचे आयोजन करण्यात आले आहे. आयोजनाचे हे दुसरे वर्ष असुन मागील वर्षीपण या शिबिरास व रोप वाटपास भव्य असा प्रतिसाद रक्तदाते व वृक्ष लागवड प्रेमी यांच्याकडून मिळाला होता.

तरी यावर्षीपण या भव्य रक्तदान शिबिरास व आंबा फळ रोप वाटपाच्या कार्यक्रमास जास्तीत जास्त संख्येने रक्तदाते व वृक्ष लागवड प्रेमी यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन आयोजक व विनीत समस्त गावकरी मंडळी पालोद व पालोदकर परिवार यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

## "मी रमाई"या एकपात्री नाटकाचा सिल्लोड मध्ये आज प्रयोग प्रसिद्ध सिने अभिनेत्री प्रियंका उबाळे करणार सादरीकरण

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड** : –महाराष्ट्राच्या सिनेसृष्टीला आपल्या कलात्मक शैलीने वेड लावणाऱ्या प्रसिद्ध सिने अभिनेत्री प्रियंका उबाळे यांचा आज दिनांक:१९/०६ /२०२५ रोजी सिल्लोड येथे शेवंताबाई मंगल कार्यालयात "मी रमाई" या एकपात्री नाटकाचा प्रयोग सादर होत आहे. प्रसिद्ध सिने अभिनेत्री प्रियंका उबाळे या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थिनी असून त्यांना मुळातच कलाक्षेत्राची आवड असल्यामुळे त्यांनी मी रमाई या एकपात्री नाटकाची स्वतः निर्मिती केली. व या एकपात्री नाटकाचे प्रयोग संपूर्ण महाराष्ट्रामध्ये नव्हे तर देशामध्ये त्या करत असून आज



पर्यंत वीस पर्यंत त्यांचे न भूतो न भविष्यती प्रयोग झालेले असून त्यांना आंबेडकरी समाजाकडून नव्हे तर इतर समाजाकडून सुद्धा अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळालेला आहे. त्या गेल्या तीन ते चार दिवसापासून सिल्लोड या शहरात आलेल्या असून प्रत्येक बौद्ध अनुयायांची बौद्ध उपासकांची उपासिकांची भेट घेऊन स्वतः "मी रमाई" या एकपात्री नाटकेच्या संदर्भात माहिती देत आहे आणि आज त्यांचा हा नाट्य प्रयोग सादर होत आहे. सिल्लोड शहरात त्यांना आवर्जून सहकार्य करणारे धम्म बांधव फुले शाहू आंबेडकर चळवळीचे कार्यकर्ते सिल्लोड नगरीचे माजी उपनगराध्यक्ष संजय आरके, नगरसेवक जितेंद्र आरके, प्रसिद्ध आंबेडकरी विचारवंत प्रभाकर पारधे, आंबेडकरी कार्यकर्ते अशोक सोनवणे, आंबेडकरी कार्यकर्ते अमित आरके, समता सैनिक दलाचे कार्यकर्ते कडुबा दुबे, श्रावण अंभोरे, पत्रकार दशरथ सुरडकर, यांनी सहकार्य केले आहे. सदरील "मी रमाई" या एकपात्री नाटकासाठी १०००,५००,२०० रुपये तिकीट दर आकारुन या आंबेडकरी चळवळीतील त्यागमूर्ती माता रमाईचे जीवन चरित्र आपल्या अभिनयाने हुबेहूब साकारणारी महाराष्ट्राची प्रसिद्ध सिने अभिनेत्री प्रियंका उबाळे हिला मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत करण्याचा प्रयत्न समाजाकडून केला गेला आहे. आणि आज "मी रमाई" या एकपात्री नाटकाचा अभिनेत्री प्रियंका उबाळे ही प्रयोग सादर करत आहे.

## मा.नगरसेवक पंकज इंगोले यांची शिवसेनेच्या शहर प्रमुख पदी नियुक्ती.

### शिवसेना नेत्या भावनाताई गवळी यांनी नियुक्तीपत्र केले सुपुर्द

वाशिम(प्रतिनिधी) स्थानिक येथील वाशिम नगर परिषदेचे माजी नगरसेवक समाजसेवी व्यक्तिमत्व पंकज इंगोले यांची नुकतीच शिवसेना शिंदे गटाच्या वाशिम शहर अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आलेली आहे. शिवसेना नेत्या विद्यमान आमदार भावनाताई गवळी यांच्या उपस्थितीमध्ये आगामी काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक नियोजन केल्या जात आहे. या माध्यमातून त्यांनी वाशिम शहरातील प्रसिद्ध व्यक्तिमत्व पंकज इंगोले यांची नुकतीच एका नियुक्तीपत्राद्वारे वाशिम शहराच्या शहराध्यक्षपदी निवड केलेली आहे.यावेळी त्यांच्या समवेत ओमप्रकाश फड अजय सुरूशे विलास ढेले यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.पंकज इंगोले हे गेल्या अनेक वर्षापासून शिवसेना या पक्षामध्ये कार्यरत असून मागील काळात त्यांनी वाशिम शहरातील नगर परिषदेमध्ये देखील नगरसेवक म्हणून काम केलेले आहे.त्यांना पक्ष संघटनेच्या बाबतीत मोठा अनुभव देखील आहे. ही बाब लक्षात घेऊन शिवसेना नेत्या भावनाताई गवळी यांनी त्यांची वाशिम शहराच्या शहराध्यक्षपदी निवड करून त्यांना पुढील राजकीय व सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिलेल्या आहेत.पंकज इंगोले यांची शिवसेनेच्या वाशिम शहराध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## समता सैनिक दल प्रशिक्षण शिबीर डिंगोरे जुन्नर येथे संपन्न

**दैनिक युवक आधार**
**जुन्नर/प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा पुणे जिल्हा पश्चिम अंतर्गत जुन्नर तालुका संरक्षण विभाग यांचे वतीने व बौध्द विकास तरूण मंडळ डिंगोरे यांच्या नियोजनातुन रविवार दि.15/ 06/2025 रोजी सकाळी 10.00 ते सांय 5.00 वाजेपर्यंत एक दिवशीय समता सैनिक शिबीर यशस्वीपणे संपन्न झाले. मेजर अड.अनिल कांबळे केंद्रिय शिक्षक, समता सैनिक दल/बी.एस.आय.पुणे डिव्हिजन पुणे,मेजर सुभाष कांबळे केंद्रीय शिक्षक,समता सैनिक दल पुणे बटालियन यांनी शिबिरार्थींना ग्राउंड व लेखी स्वरूपात उत्तम प्रशिक्षण दिले. शिबिर कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभा पुणे जिल्हा पश्चिम संस्कार उपाधयक्ष केंद्रीय



शिक्षक आयु.रविंद्र अभंग, जुन्नर तालुका अध्यक्ष आयु.नितीन साळवे, सरचिटणीस आयु.यशवंत गायकवाड,कोषाध्यक्ष आयु विजय वाघमारे, हिशेब तपासनीस आयु खंडू माळवे .संस्कार उपाधयक्ष केंद्रिय शिक्षक आयु.अतिश उघडे, संरक्षण उपाध्यक्ष,समता फोर्स डिव्हिजन ऑफिसर पुणे आयु.दिपक खरात,संस्कार सचिव आयु.संजय धोत्रे समता सैनिक व प्रचार पर्यटन सचिव आयु. प्रभाकर धोत्रे,आयु.राहुल धोत्रे,आयु.बाळासाहेब खरात(शाखा पनवेल).आयु.सुनिल शिंदे,आयु. चेतन साळवे (माजी श्रामणेर)बौध्दाचार्य आयु. बी.बी.खरात,आयु.मिलिंद खरात, भारतीय बौद्ध महासभा पदाधिकारी महासभा पदाधिकारी राष्ट्रपती पुरस्कार साहित्यिक डॉ खं र माळवे,आयु.गौरव कदम,आयु.रविंद्र धोत्रे,आयु.कैलास साळवे,आयु. विजय हिंगे,यांनी शिबिरात भाग घेतला. समता सैनिक प्रशिक्षण शिबिरात तालुक्यातील १० महिला व १५ पुरूष एकूण २५ शिबिरार्थिनी सहभाग घेतला. बौध्द विकास तरूण मंडळ डिंगोरे पदाधिकारी,उपासक,उपासिका,उपस्थित होते. आयु.दिपक भगवान खरात समता फोर्स सैनिक डिव्हिजन ऑफिसर,पुणे संरक्षण उपाध्यक्ष भारतीय बौध्द महासभा जुन्नर तालुक्याच्या वतीने सर्वांचे आभार मानले

## सार्वजनिक उद्यानात उभारले बंदिस्त खेळाचे मैदान, शेकापची कारवाईची मागणी

**दैनिकयुवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**



खारघर, सेक्टर 19 मधील सार्वजनिक उद्यानात बंदिस्त खेळाचे मैदान उभारण्यात आले आहे. या मैदानात विशिष्ट शुल्क आकारून ही जागा खेळाडूंना खेळण्यास देण्यात येत आहे. आणि या मैदानाचे भाडे येथील स्थानिक नगरसेवक घेत असल्याचा आरोप शेकापच्या रायगड जिल्हा सहचिटणीस तेजस्वी जगदीश घरत यांनी केला आहे. यावर कारवाई करण्यासाठीचे निवेदन त्यांनी पनवेल पालिका आयुक्तांना दिले आहे. उद्यानातील या मैदानात फुटबॉल, बॅडमिंटन, हॉलीबॉल, स्केटिंग खेळण्यात येत आहे. तसेच या मैदानाच्या आतील आणि बाहेरील बाजूस राजकीय व अकॅडमीचे अनधिकृतरित्या पोस्टर्स लावण्यात आलेले आहेत. खेळाच्या नावाने या ठिकाणी आर्थिक गैरव्यवहार होत असल्याचा आरोप तेजस्वी घरत यांनी केला आहे. या उद्यानाची दुरावस्था झालेली दिसून येत आहे. गेट देखील तुटलेल्या अवस्थेत आहे तर अनेक ठिकाणी झाडांच्या सुकलेल्या फांद्या पडलेल्या आहेत. अनेक ठिकाणी गवत उगवलेले आहे.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त गुळसुंदे येथे वृक्षारोपण व वृक्ष वाटप कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

माजी खासदार, समाजसेवक, व दानशूर व्यक्तिमत्व लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ७५ व्या वर्षात प्रवेश केला असून त्यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त गुळसुंदे येथे वृक्षारोपण व वृक्षवाटप कार्यक्रम आज (दि. १८) पार पडला. पर्यावरण संवर्धन, हरित क्षेत्र वाढवणे आणि भावी पिढ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करणे या उद्देशाने हा कार्यक्रम राबवण्यात आला. महाराष्ट्र राज्य पर्यावरण संरक्षण संस्थेचे माजी निरीक्षक तसेच पनवेल तालुका कुंभार समाज अध्यक्ष बजरंग भागवत, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते महादेव कावडे, सामाजिक कार्यकर्ते महेश ठोकळ, शिक्षिका महाले मॅडम व विद्यार्थ्यांच्या




हस्ते वृक्षारोपण झाले. कार्यक्रमात चिकू, आंबा यांसारख्या कलमी फळझाडांची वृक्षलागवड करण्यात आली. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणप्रेम जागृत व्हावे यासाठी त्यांना झाडांचे वाटप करण्यात आले. लहानग्यांच्या हातून रोपांची लागवड करून "एक झाड, एक जीवन" हा संदेश देण्यात आला. पर्यावरण रक्षणाची गरज अधोरेखित करत सहभागी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले व पुढील काळात अधिकाधिक वृक्षलागवड करण्याचा संकल्पही करण्यात आला.लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली समाजहिताचे असे उपक्रम हे नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरत असून, त्यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राबवण्यात येणारे उपक्रम समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी उपयुक्त ठरणार आहेत.

# सहकाराच्या क्षेत्रात सामान्यांचा विचार करणारा महर्षीः लोकनेते कै.माणिकराव ( दादासाहेब ) पालोदकर यांची आज १०१ वी जयंती विशेष

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड : –** माजी खासदार, महाराष्ट्र राज्याचे माजी सहकार व महसूल मंत्री कर्मयोगी सहकार महर्षी माणिकराव पालोदकर उर्फ दादासाहेब यांचा जन्म १९ जून १९२४ साली झाला. तर मृत्यू २३ मे २००२ साली झाला, त्यांना जवळपास ७८ वर्ष आयुष्य लाभले. त्यांनी शैक्षणिक संस्था, साखर कारखाना, बँक, पतसंस्था, सूतगिरणी, खेळणा प्रकल्प यांची मुहूर्तमोड रोवून सिल्लोड तालुक्याचा सर्वांगीण विकास घडवून आणला. त्यांच्या या कार्यासाठी आजही ते सर्वसामान्याच्या मनात आदर राखून आहेत. आपल्या कार्यातून स्वतःची ओळख निर्माण करणारे सहकार महर्षी माणिकराव पालोदकर यांची आज रोजी १०१ वी जयंती साजरी केली जात आहे त्यानिमित्ताने हे विचार पुष्प. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या सिल्लोड तालुक्यातील पालोद हे गाव सहकारमहर्षी माणिकराव पालोदकर यांची जन्मभूमी, कर्मभूमी. हे गाव खेळणा नदीच्या काठावर वसलेले





आहे. याच ठिकाणी खेळणा नदीवर सहकार महर्षी माणिकराव पालोदकर यांच्या प्रयत्नातून तयार झालेल खेळणा मध्यम प्रकल्प हे धरण आहे. आज याच धरणातून सिल्लोड शहरासह आठ ते दहा गावांना पाणीपुरवठा केला जातो. सहकार महर्षी माणिकराव पालोदकर यांनी आपल्या कार्यकाळात अनेक प्रकल्पाची मुहूर्तमेढ रोवली व महत्त्वाच्या पदावर उत्कृष्ट कामं केली. यामध्ये माणिक नगर येथील सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याची स्थापना करून अनेक युवकांना रोजगार दिला, तसेच ते सिद्धेश्वर सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष, सिद्धेश्वर नागरी सहकारी बँकेचे संस्थापक अध्यक्ष, सिद्धेश्वर सहकारी सूतगिरणीचे संस्थापक अध्यक्ष, सिद्धेश्वर सहकारी औद्योगिक वसाहतीचे संस्थापक अध्यक्ष, राज्याच्या पंचायत राजकुमारीचे सदस्य, वसंतदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळात राज्याचे सार्वजनिक बांधकाम व उत्पादन शुल्क राज्यमंत्री, शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या मंत्रिमंडळ राज्याचे सहकार व महसूल राज्यमंत्री, १९६२ ते १९६७ ची पाच वर्षे सिल्लोड पंचायत समितीचे सभापती १९६७ ते १९७२ औरंगाबाद जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, राज्याच्या वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष, भारत सरकारच्या कृषी मूल्य आयोगाचे सदस्य, रेल्वे बोर्डाचे हैदराबाद डिव्हिजन सदस्य, मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सदस्य, मांजरी बुद्रुक जिल्हा पुणे येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट चे सदस्य, १९७१ ते १९७७ अशी सहा वर्षे लोकसभा सदस्य, तर १९८०ते १९९५ अशी सलग पंधरा वर्षे विधानसभा सदस्य, या व अशा अनेक पदावर त्यांनी जबाबदारीने काम केले व आपल्या कार्यातून ठसा उमटवला. त्याचबरोबर शिक्षण क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी त्यांनी केलेली आहे. २ नोव्हेंबर १९७१ मध्ये सिल्लोड सारख्या ग्रामीण भागात राजश्री शाहू शैक्षणिक संस्था स्थापन करून वर्षभरातच यशवंतराव चव्हाण यांच्या नावाशी साधर्म्य असणारे यशवंत कला व वाणिज्य महाविद्यालय सुरू केले, पुढे यशवंतराव चव्हाण यांच्या निधनानंतर त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय असा नाव विस्तार त्यांनी केला. आज शिक्षण क्षेत्रामध्ये एक आदर्श संस्था म्हणून राजश्री शाहू शिक्षण संस्थेकडे पाहिल्या जाते. माणिकराव पालोदकर यांनी लावलेल्या या छोट्याशा वृक्षाचे आज वटवृक्षात रूपांतर झालेले आहे तर सिल्लोड, सोयगाव, फुलंब्री, भोकरदन या तालुक्यामध्ये उत्कृष्ट प्रकारे ज्ञानार्जन करण्याचं काम ही संस्था करत आहे. आपल्या सामाजिक आयुष्यात त्यांनी शैक्षणिक संस्था, साखर कारखाना, बँक, पतसंस्था, सूतगिरणी, खेळणा प्रकल्प यांची मुहूर्तमेड रोवून सिल्लोड तालुक्याचा सर्वांगीण विकास घडवून आणला. त्यांच्या या कार्यासाठी आजही ते सर्वसामान्याच्या मनात घर करून आहेत. म्हणूनच, "सहकाराच्या क्षेत्रात सामान्यांचा विचार करणारा महर्षी म्हणजेच सहकार महर्षी माणिकराव पालोदकर असे त्यांना संबोधतात" अशा या जनमानसात आदराचे स्थान मिळविणारे सहकार महर्षी माणिकराव पालोदकर यांच्या जयंती निमित्त त्रिवार अभिवादन.

*भारताचे माजी पंतप्रधान स्व.राजीव गांधी यांच्यासमवेत सहकार महर्षी दादासाहेब पालोदकर

## कोळी महिलांचा अपमान करणाऱ्या लिशिअस कंपनीची जाहिरात बंद करा; तळोजा येथील कंपनीत शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षाची धडक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** मुंबईसह महाराष्ट्रात मांसाहार पदार्थांची ऑनलाईन विक्री करणारी लिशिअस फूड कंपनीच्या जाहिरातीमध्ये पारंपरिक मच्छीमार महिलांकडून विकले जाणारे मासे हे ताजे नसतात, असे दाखवून केवळ आमच्याच कंपनीकडे ताजे मासे असतात, असा दावा जाहिरातीतून करण्यात आला आहे. याला मुंबईतील मासे विकणाऱ्या कोळी महिलांनी तीव्र आक्षेप घेतला असून तक्रारीनंतर आज शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षाच्या शिष्टमंडळाने पनवेल येथील तळोजा औद्योगिक वसाहती मध्ये असलेल्या लिशियस कंपनीच्या डिलाइटफुल गॉरमेट प्राइवेट लिमिटेड येथे धडक मारू जाहिरात बंद करा, अशी मागणी केली आहे. लिशिअस फूड कंपनीच्या ताज्या माशाच्या जाहिराती या मोठ्या प्रमाणात टीव्ही आणि सोशल मीडियावर सुरू आहेत. मात्र, स्वतःची जाहिरात करताना इतरांच्या मासे विक्रीला नावे ठेवण्याचा प्रकार, कमी समजण्याचा प्रकार कंपनीकडून सुरू आहे. या विरोधात कोळी महिलांनी शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षाची कडे लेखी तक्रार केल्यावर कक्षाचे अध्यक्ष शिवसेना नेते खासदार अनिल देसाई यांच्या सूचनेनुसार कक्षाचे रायगड जिल्हा संघटक शशिकांत डोंगरे, उपजिल्हा संघटक सुनीत पाटील, कळंबोली शहर संघटक राजेश केणी, कामोठे शहर संघटक भरत शिंदे, उपशहर संघटक गणेश खांडगे, संदीप कदम, प्रशांत महाडिक आदींनी लिशिअस कंपनीच्या कार्यालयाला भेट देत ही जाहिरात त्वरित बंद करावी, असे निवेदन दिले. जाहिरात बंद झाली नाही तर शिवसेना स्टाईल आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान कंपनीही सेम डे कॅच' म्हणजेच त्याच दिवशी मासे पकडून विक्री करत असल्याची खोटी जाहिरात करत आहे, यावरदेखील कक्षाने आक्षेप नोंदवला व याबाबत ॲडव्हर्टायझिंग कौन्सिल ऑफ इंडिया यांच्याकडेदेखील तक्रार नोंदवण्यात येणार आहे, असे कक्षाचे रायगड जिल्हा संघटक शशिकांत डोंगरे यांनी कंपनीला ठणकावले आहे




## मिळकतखारात अनधिकृत भरावामुळे शेतं जलमय; एस.डी.ओ.च्या फुशारक्या हवेत विरल्या!

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**


अलिबाग तालुक्यातील मिळकतखार गावात करण्यात आलेल्या अनधिकृत भरावामुळे आता गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. भरावामुळे शेतकऱ्यांच्या शेतात पावसाचे पाणी तुंबले असून, आजूबाजूच्या गावांमध्येही पुरजन्य स्थिती निर्माण होण्याची भीती प्रत्यक्षात उतरली आहे. गेल्या महिन्यात सामाजिक कार्यकर्ते संजय गंगाराम सावंत व ग्रामस्थांनी भरावाची तक्रार करताच, "वेळ पडल्यास शासन भराव काढून टाकेल" अशा फुशारक्या अलिबागचे एस.डी.ओ. उर्फ प्रांत अधिकारी यांनी दिल्या होत्या. मात्र आता पाणी घरात घुसायला लागल्यावर आणि शेतं पूर्णपणे जलमय झाल्यावरही संबंधित अधिकारी गायब आहेत!ग्रामस्थांनी शेवटी स्वखर्चाने जेसीबी लावून अडलेलं पाणी काढण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. सरकारी यंत्रणा मात्र ढिम्म असल्याचा संताप ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे."भराव वेळ पडल्यास शासनाकडून काढून घेतो म्हणणारे अधिकारी आज कुठे आहेत?" असा थेट सवाल सामाजिक कार्यकर्ते संजय गंगाराम सावंत यांनी माध्यमांशी बोलताना उपस्थित केला. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ग्रामस्थ, शेतकरी आणि परिसरातील नागरिक अडचणीत सापडले आहेत. या प्रकरणात तातडीने उच्चस्तरीय चौकशी करून भराव हटवण्यात यावा आणि दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही जोर धरत आहे.




## “पतीचे बायकोवरचे प्रेम... आणि सराफाची माणुसकी – व्हायरल व्हिडीओमागची काळीज हेलावणारी कथा!”

**आसाराम विरकर**
**उपसंपादक, दैनिक युवक आधार –**
**मराठवाडा आवृत्ती**

**छत्रपती संभाजीनगर** – एक ९३ वर्षांचा आजोबा, त्यांच्या पत्नीला – म्हणजे आजीला – एखादा दागिना घेऊन द्यावा या प्रेमाने सराफाच्या दुकानात येतात... आणि पुढे जे घडतं, त्याने सोशल मीडियावर लाखोंच्या डोळ्यांत अश्रू आणलेत. ही हृदयस्पर्शी गोष्ट आहे छत्रपती संभाजीनगरमधील प्रसिद्ध सराफ निलेश खिंवसरा यांच्या दुकानातील. काही दिवसांपूर्वी एक वृद्ध दांपत्य त्यांच्या दुकानात आलं. वयाने थकलेले, पण नात्यांमध्ये जीव ओतलेले हे जोडपं. आजोबांनी अगदी जपून ठेवलेले जुने पैसे आणि चिल्लर आजीसाठी दागिना खरेदी करण्यासाठी





पुढे केले. निलेशजींच्या मनाला या दृश्याने स्पर्श केला. या आजी–आजोबांच्या गप्पांमधून समोर आलं की, त्यांच्या आयुष्यानेही त्यांना कमी झळा दिलेल्या नाहीत. एक मुलगा काही महिन्यांपूर्वी वारला, दुसरा व्यसनाधीन. या वेदनेनं त्रस्त होऊन, त्यांनी घर सोडून दिलं. आता दोघं मिळून एका छोट्याशा जागेत राहतात – एकमेकांची साथ हीच उरलेली. पण या साऱ्या दुःखातही, आजोबांचं आजीवरचं प्रेम आजही टिकून आहे – ते गहिरं झालं आहे. या नात्याचं साक्षात दर्शन निलेश खिंवसरांना झालं. त्यांनी या जोडप्याची गोष्ट ऐकली आणि दोघांनाही एक आनंदाचा क्षण मिळवून देण्याचा प्रयत्न केला. दुकानात ग्राहकांचा फीडबॅक घेत असताना हे संवाद कॅमेऱ्यात टिपले गेले. निलेशजींनी दोघांकडून १०–१० रुपयांच्या नोटा घेतल्या आणि म्हणाले, “पांडुरंग आणि रुक्मिणी भेटले, तुमचा आशीर्वाद मिळाला.” या शब्दांनी वातावरण अधिकच भावूक झालं. हा क्षण व्हिडीओच्या माध्यमातून सोशल मीडियावर पोहोचला आणि पाहता पाहता तो लाखोंच्या काळजात घर करून बसला. या व्हिडीओवर कौतुकाचा वर्षाव होतो आहे – एक प्रेमळ पती, एक समंजस पत्नी, आणि त्यांचं प्रेम ओळखून त्याला सन्मान देणारा एक सजग सराफ. ही गोष्ट नात्यांची, आपुलकीची, आणि जिव्हाळ्याच्या भावनेची आहे. जिथे सगळं यांत्रिक होत चाललंय, अशा काळात हे वृद्ध जोडपं आणि निलेश खिंवसरा यांचं माणुसकीचं दर्शन आपल्याला आयुष्याच्या खऱ्या अर्थाची आठवण करून देतं.

## युवा सेनेच्या प्रयत्नामुळे पनवेलमधील उड्डाणपुलाच्या एक्झिटवर कनेक्टरमध्ये गॅप काढला भरून

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**

पनवेल शहरातील मुख्य उड्डाणपूल डीएड कॉलेजकडे उतरताना दुचाकी चालकांसाठी धोकादायक झाला आहे. विजय सेल्स ते डीएड कॉलेज यांना जोडणाऱ्या उड्डाणपुलाच्या एक्झिटवर कनेक्टरमध्ये गॅप निर्माण झाली आहे, ज्यामुळे डीएड कॉलेजजवळ उतरणाऱ्या एक्झिटजवळ बाईकचे टायर या गॅपमध्ये अडकून वारंवार अपघात होत आहेत. या उड्डाणपुलावर सकाळपासून तीन दुचाकीस्वारांचे अपघात झाल्याचे सांगण्यात आले. याबाबतची माहती मिळताच शिवसेनेचे युवासेना जिल्हा अधिकारी पराग मोहिते आणि शहर अधिकारी निखिल भगत यांनी अपघाताच्या ठिकाणाची पाहणी करून तातडीने पुढील कारवाई केल्याने अपघात सत्र थांबले आहे . या संदर्भात त्यांनी पनवेल वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक संजय पाटील यांना माहिती दिली. तसेच अपघाताचा व्हिडीओ चित्रीत



करून तत्काळ वाहतूक अंमलदार रवाना करण्यास सांगितले. ही घटना रेकॉर्ड करत असतानाच त्याच ठिकाणी एक दुचाकीस्वार कोसळल्याचे निदर्शनास आले.गेली २ वर्षे हा उड्डाणपूल एमएसआरडीसीच्या हलगर्जीपणामुळे मृत्यूचा सापळा बनत चालला आहे. जागोजागी पडलेल्या खड्ड्यांमुळे अपघात होत आहेत. याबाबतएमएसआरडीसीच्या अधिकारी शैलजा पाटील यांच्याशी युवासेना अधिकाऱ्यांनी फोनवरून चर्चा करून येथील गॅप तत्काळ भरून घेण्याची मागणी केली. त्यानुसार एमएसआरडीसीने तात्पुरती उपाययोजना केली आहे. मात्र, एमएसआरडीकडून याबाबत ठोस उपाययोजना न केल्यास युवासेना एमएसआरडीसीच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन करेल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

कोट – एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या चर्चेनुसार, ब्रिजवरील खड्डे बुजवून तेथील प्रत्येक बाजूला एक्झिटआधी स्पीडब्रेकर टाकण्याचे ठरले आहे, जेणेकरून मुख्य रस्त्यावरून येणारी वेगवान वाहने स्लो होऊन अपघाताचा संभाव्य धोका कमी होईल. मूळ अपघाताचे कारण असलेल्या गॅपमध्ये केमिकल टाकून ती भरण्यात येईल. तसेच लोखंडी पट्टीवर ॲंटी स्लिप पेंट मारण्यात येणार आहे, ज्यामुळे वाहने घसरणार नाहीत. या अनुषंगाने आवश्यक उपाययोजना प्रशासनाच्या माध्यमातून केल्या जात आहोत. यात कुठलीही हयगय अथवा दिरंगाई युवासेना सहन करून घेणार नाही. – पराग मोहिते, युवासेना जिल्हा अध्यक्ष

## कवयित्री अश्विनी सांगळे यांना 'समाज क्रांती' राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

### बी.एस.एफ. बहुद्देशीय संस्थेची निवड ऑगस्टमध्ये अमरावतीत पुरस्कार सोहळा

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**शिरवाडे वाकद :-** परिसरातील सत्यगाव येथील सुप्रसिद्ध कवयित्री अश्विनी सांगळे यांची ‘समाज क्रांती राज्यस्तरीय पुरस्कार २०२५’ साठी निवड झाली आहे. साहित्य क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत बी.एस.एफ. बहुद्देशीय संस्थेने हा मानाचा पुरस्कार जाहीर केला आहे.

हा पुरस्कार सोहळा येत्या ऑगस्ट महिन्यात अमरावती जिल्ह्यात पार पडणार असून, यावेळी चित्रपटसृष्टीतील नामवंत अभिनेते, अभिनेत्री, दिग्दर्शक तसेच मॉडेल्स यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. कला, पत्रकारिता, समाजसेवा, साहित्य, कृषी अशा विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या गुणवंतांना ‘समाज क्रांती’ पुरस्काराने सन्मानित केले



जाते, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष भूषण सरदार व समन्वयक शीतल गजभिये यांनी दिली. कवयित्री अश्विनी सांगळे यांच्या या निवडीमुळे स्थानिक साहित्यिक व सामाजिक वर्तुळात आनंदाचे वातावरण असून त्यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## हिवरा रोहिला गणपती..येथील शेतकऱ्यांच्या सोलर पॅनलचे नुकसान

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी**
**रणजित. ठाकुर**

वाशिम तालुक्यातील हिवरा रोहीला येथील शेतकरी सौ.जयश्री किशोर इंगळे यांच्या शेत सर्वे ७१ नंबर मध्ये सोलर पंप घेतला होता. परंतु दि.११ जुन २०२५ च्या तुफान वाऱ्यामुळे सोलर पॅनल पार उन्मळून पडल्याने व सद्यस्थितीत पावसाचा खंड पडल्याने हळद व इतर पिकाला पाणी देणे गरजे



आहे. व उद्या सुद्धा या सोलर पॅनलची गरज असनार आहे. विश्वासाने हे सोलर घेतले होते. परंतु वादळाच्या तडाख्यात हे सोलर पॅनल उडून गेल्याने आता पाणी देता येणार नाही. करिता सोलर कंपनीने झालेल्या नुकसानीची पाहणी करून नवीन सोलर पॅनल देण्यात यावे. त्यामुळे शेतकऱ्याला सहकार्य होईल. अन्यथा शेतकरी देशोधडीला लागू शकतो. व शेतीच्या येणार्‍या उत्पन्नातही घट होणार आहे.हे मात्र निश्चित. करिता तात्काळ उन्मळून पडलेल्या सोलर पॅनलला बदलून देऊन नवीन उभारणी करुन द्यावी अशी अपेक्षा हिवरा रोहीला येथील शेतकरी सौ.जयश्री किशोर इंगळे यांनी केली आहे.

## पृथ्वीतलावरील देव कोण

देवाला प्रत्यक्ष बघितले नाही परंतु, जर पृथ्वीतलावरील देव कोण? विचारला तर मी नक्कीच म्हणेन आई व बाबा! आई तर जगदजननी आहेच. तिच्या समर्पणाला,तिच्या आभाळभर मायेला तोड नाहीच परंतु बापाचं समर्पण,त्याग,माया परमेश्वराच्या भक्तीतून मिळणाऱ्या आशीर्वादाच्या तुलनेत आहे.अर्थात परमेश्वराचे दुसरे रूपच जणू...! जेव्हा–जेव्हा काही भले मोठे संकटे समोर उभे राहत तेव्हा बाबा तुमची आठवण येतेच..! एकांतात परमेश्वरा जवळ जातो. त्याच्या समोर हात जोडतो आणि केवळ लढण्यासाठी समस्यांना, सामोरे जाण्यासाठी शक्ती दे. फक्त माझ्या बाबा इतकी..! बस एवढेच म्हणतो. कारण जगाच्या पाठीवरील इतरांचा आदर्श नकोय मला. इतरांच्या संघर्ष कहाण्या पण नकोय मला. मी त्यांच्या संघर्षाबद्दल शंका घेतोय अशातलाहि भाग नाही परंतु,मी तुमचा संघर्ष उघड्या डोळ्याने बघितला आहे. बाबा! मी एका विशिष्ट वयात होतो तेव्हा,खरंच! तुम्ही फारसे आठवला नाही कारण,त्या वयात उनाडपणा होता.तुम्ही कमावलेल्या पैश्यावरून गरजा भागवत होतो,तेव्हा तुमचा त्याग लक्षात येत नव्हता. कदाचित! तुम्ही आमच्यासमोर तुमचं दुःख लपवलं असेल. डोळ्यात येणाऱ्या अश्रूंना एका कोपऱ्यात, एकांतात जाऊन हळूच हाताच्या अंगठ्यानं डोळ्याच्या कडांजवळ जमा झालेले अश्रू हळूच पुसून, आमच्या समोर उभे राहताना खोटं–खोटं हसत असणार. नक्कीच ! कारण, अण्णा !मी या वयात ते अनुभवतोय.जेव्हा तुम्ही माझ्या वयात होता, तेव्हा नक्कीच तुमच्यासमोर अशा समस्या उभ्या राहिल्या असतील. संकटे उभे राहिले असतील.तेव्हा, काय केलं? कसे जगलात? अश्रूंना गिळून की,आमच्या सोबत खोटं बोलून...! नक्कीच ! खोटारडे आहात तुम्ही..! माफ करा..! स्वतःसाठी नाही जगलात ना मन भरून कधीच. नक्की सांगा. कितीतरी वेळेस इच्छा मारून जगलात ना तुम्ही..! किती खोटं बोललात हो अण्णा स्वतः सोबत. आम्हा सर्वांच्या गरजा भागवता–भागवता,आमच्या हौस–मौज गरजा लाड पुरवताना,स्वतःला कितीतरी वेळेस समजावले नं मनाला कि,गप्प रहा! तुला फक्त स्वप्न बघण्याचा अधिकार आहे.अण्णा! खरं सांगा. एखाद्या दुकानासमोरून जातांना, काचेतून सुंदर असा शर्ट टांगलेला दिसला असेल. तो तुम्हांला आवडला असेल.तुम्हांला तो विकत घ्यावासा वाटला असेल.तुम्हाला घालावासा वाटला असेल.मग तेव्हा तुम्ही काय केलं?नक्कीच दुकानासमोरून जातांना येतांना त्यांच्याकडे बघत असणार, त्याची किंमत किती असेल? दुकानात जाऊन विचारावसं वाटत असेल. तेवढ्यात! आमच्या भावांच्या काही गरजा,समस्या निर्माण झाल्या असतील. हो ना..! आमच्यापैकी कुणाची चड्डी फाटली असणार,कुणाला शर्ट हवा असणार,बहिणीला टिकली बांगडी घ्यावीशी वाटली असणार, तर मायनं अचानक घरातील एखादी वस्तू संपली म्हणून आणायला सांगितली असणार...! मग तेव्हा,तुम्ही एकांतात बसून अगोदर विचार केला असेल की,काय घ्यावं? अगोदर आमच्या गरजांचा नक्की विचार केला असेल अन हो केलाच...! कारण फक्त हे तुम्हींच करू शकता. कितीतरी महिन्यांपासून मनात घर करून ठरवून ठेवलेलं शर्ट.कि जे आज खरेदी करू,उद्या खरेदी करू,या विचारा –विचारात ते एखाद्या गिऱ्हाईकाने विकत घेतलाही असणार,अन तुम्ही मनाला परत समजूत घातली असणार की, ठीक आहे ! बघू, पुढील वेळेस त्याहीपेक्षा छान घेऊ, असं म्हणत,फाटलेला जुनाच शर्ट शिवून घातला असणार..!अन हो! हे फक्त तुम्हीच करू शकता कारण, हे तेव्हढंच खर आहे. आम्हां सर्व लेकरांचा "बाप"म्हणून एवढे सामर्थ्य, सहनशीलता, त्याग, समर्पण फक्त तुमच्यातच आहे बाबा...! "अण्णा" हा शब्द छानच आहे. आम्ही लहानपणापासून सर्व भावंडे तुम्हाला अण्णाच म्हणतो परंतु,बऱ्याच ठिकाणी मी "बाबा" हा शब्द वापरला आहे. तो आमच्यासारख्याच जगाच्या पाठीवरील लेकरांसाठी झटणाऱ्या, समर्पण करणाऱ्या समस्त बाबांसाठी आहे म्हणून, मी तुम्हाला आज खोटारडे बाबा म्हटलं कारण, दुःख लपण्याची ताकद फक्त तुमच्यातच आहे. अंतर्मनातील दडलेलं दुःख लपून चेहऱ्यावर खोटं–खोटं हसू आणून हसत राहणं, फक्त तुम्हालाच शक्य आहे बाबा ! एखादी गोष्ट आवडत असूनही मुद्दामहून नाही,अहं, मला नाही आवडत, असं मनाचं सांत्वन करून जगणं, फक्त तुम्हालाच शक्य आहे. भूक असतांना अगोदर आम्हां लेकरांचे पोट कसे भरणार याचा विचार करणारे तुम्ही, खोटे बोलून,माझी पोटाची तब्येत बरी नाही म्हणून, गटागटा तीन–चार ग्लास पाणी पिऊन भूक शमवण्याची शक्ती फक्त तुमच्यात आहे. खिशात दहा रुपये असताना शंभर रुपयाची वस्तू आम्ही मागतो. मग कौशल्याने समजावून सांगता अन, हळूच कुठून तरी जुळवाजवळ करून ती गोष्ट आणून देता. हे कसं जमतं हो तुम्हाला? ही शक्ती येते कुठून तुमच्यात? नक्कीच तुम्ही देव आहात. या पृथ्वीतलावरचे....! नाही,नाही एवढं हे कोणाला शक्य नाही हो ! स्वतःच्या इच्छा मारून काही गोष्टी मनातल्या मनात ठेवून, खोटं बोलून मनाला समजूत घालणारा,लेकरांसाठी आणि कुटुंबासाठी जगणारा बाबा हा स्वतःसाठी लय खोटा असतो.दुःख लपवून जगासमोर हसणारा बाबा..! यु आर माय फेवरेट हिरो ! तुम्ही जगण्याचा बळ आहात..!

**श्री विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि बुलडाणा**

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## कोकण कट्टा कडुन बालग्राम बालकांना एक हजार सातशे पन्नास किलो धान्य भेट

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

विलेपार्ले येथील सेवार्थ उपक्रम करणारी नामवंत संस्था कोकण कट्टा या संस्थे कडुन बालग्राम पेण संस्थेच्या अनाथ, गरीब, गरजू आदिवासी पाड्यातील शालेय विध्यार्थीयांसाठी तांदूळ व डाळ १७५० किलो धान्य व पेन पेन्सिल भेट देण्यात आली ग्राम संवर्धन संस्थेचे सर्वेसर्वो रायगड भूषण संतोष ठाकूर, राजेश रसाळ, राजू पाटील, मानसी ताई यांच्या कडे सुपूर्द केले,. कोकण कट्टाचा फणस जंगल या उपक्रम ही येथे मुलांकडून रोप वाटिकासाठीसाठी १०० हुन अधिक बिया रोपण करण्यात आल्या संस्थांपक अजित पितळे मार्गदर्शक दादा गावडे, सुजित कदम, अशोक भोईर आणि निशिकांत मोरे उपस्थित होते. पार्लेकर तसेच श्री स्वामी समर्थ मठ पारले, वीर हनुमान सोसायटी,२ नं, अचानक क्रीडा मंडळ. यांचे ही योगदान भिक्षा फेरीला लाभले होते... संतोषजी ठाकूर यांनी देणगीदार नागरिकांचे आभार मानले. कोकण कट्टाच्या माध्यमातून साई आधार भाताणे येथे २००० किलो तर कुडाळ येथील जीवन आनंद संस्थेला १२५ किलो तर बोरिवली येथील टच संस्थेला ५०० किलो धान्य देण्यात आले आहे. सह्याद्री संस्था देवबांध यांना ५०० किलो धान्य देण्यात येईल. कोकण कट्टा संस्थापक अजितदादानीं यासेवेत सहभागी सर्व सदस्य आणि नागरिक यांचे मनापासुन आभार मानले व प्रतीवर्षी अशीच मदत करत करावी असें नम्र आवाहन केले.




## तक्रारीचे निराकरण न केल्यामुळे धानोरा ग्रामवासी यांनी जिल्हाधिकारी यांना दिले निवेदन
## तलाठी यांची बदली न केल्यास आमरण उपोषणाचा इशारा

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः**
**-जितेंद्र खोडे**

राळेगावः-तालुक्यातील धानोरा येथे सध्या रुजू असलेले तलाठी शिवानी सातोकर यांची तहसीलदार यांना तक्रार केली त्या तक्रारीत समस्त ग्रामवासी यांनी धानोरा येथे सरकारी तलाठी कार्यालय असून तलाठी दिवसभर त्या कार्यालयामध्ये हजर राहत नाही,तसेच १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी या दिवसाला पण कार्यालयात अनुपस्थितीत राहतात तसेच शेतकरी यांनी कॉल केला तर कामात आहे म्हणून सांगतात नाही तर फोन बंद करून ठेवतात. शेतकर्यांना ७/१२ व ८अ,शेतकरी कर्ज,शैक्षनिक कामासाठी नेहमी काम पाडून शेतकऱ्यांना राळेगाव वरून जाणे येणे त्रास सहन करावा लागत आहे तरी धानोरा येथील ग्रामवासी यांनी दि.२२-०६-२०२५ ला तहसीलदार यांना रुजू असलेले तलाठी शिवानी सातोकर यांची तक्रार दिली होती परंतु त्या तक्रारीचे निराकरण झाले नाही,तरी निवेदनाचे निराकरण करुन त्यांची बदली करावी अन्यथा गावातील ग्रामस्थ यांनी १ जुलै २०२५ रोजी आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला,करीता जिल्हाधिकारी यांना दि.१६ जुन २०२५ रोजी निवेदन देण्यात आले,यावेळी विशाल येणोरकर(उपसरपंच),प्रमोद ढाले,(माजी सरपंच),प्रितम घिनमिने, हर्षल घोडे, प्रणय मुडे,विशाल वरुडकर,पिन्टु घिनमिने यावेळी हजर होते.



## रोड रोमिओचा बंदोबस्त करा — राळेगाव पोलिसांना शिवसेनेचे निवेदन

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः-**
**जितेंद्र खोडे**




राळेगावः-शहरात शिक्षण घेण्यासाठी तालुक्यातील विविध गावांमधून येणाऱ्या विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. काही दिवसांत शाळा व महाविद्यालये सुरू होत असताना बस स्टँड, रावेरी पॉइंट, कला वाणिज्य कॉलेज, इंदिरा कॉलेज, विरांनी सायन्स कॉलेज, न्यू इंग्लिश हायस्कूल तसेच इतर शैक्षणिक संस्थांच्या मार्गावर काही बाईकस्वार युवक शाळकरी मुली आणि विद्यार्थिनींना त्रास देत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. याशिवाय मध्यवर्ती बँक समोर काही युवक मध्य प्राशन करून डिवायडरवर बसत असून, त्याचा त्रास शाळकरी मुली व ग्रामीण लोकांना सहन करावा लागत आहे. यामुळे विद्यार्थिनींना शाळा-महाविद्यालयात ये-जा करताना सुरक्षितता धोक्यात येत आहे. रोड रोमिओ, बेकायदेशीर जमाव, तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक यांच्याकडून होत असलेल्या त्रासामुळे पालकांमध्येही चिंता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी योग्य ती कडक कारवाई करून बंदोबस्त करण्याची मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातर्फे करण्यात आली. उपजिल्हा प्रमुख विनोद काकडे व तालुका प्रमुख विजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शहर प्रमुख इमरान पठाण यांच्या नेतृत्वात राळेगाव पोलीस स्टेशनला पोलीस उपनिरीक्षक बोरकर यांना निवेदन देण्यात आले.या प्रसंगी शहर प्रमुख इमरान पठाण , उपशहरप्रमुख दिपक येवले, सुनील सावरकर, महिंद्र तुमाने, शाखा प्रमुख अंकुश गेडाम, शहर संघटक योगेश मलोंढे, निशी पोंगडे, जीवनानरावजी रामगडे, किशोर कापसे, आशिष मरापे, राहुल चव्हाण, आदेश आडे, गौरव ठाकरे, अनिस शेख, प्रतीक देवतळे, स्वप्नील पुरी, दया आडे, ओम सगमाने तसेच महिला आघाडीच्या सुनीताताई ढगले, अनिताताई कांबळे, माया ताई सगमाने, किरण ताई घुणे, वंदना ताई पेंद्राम, काजल ताई पुरी उपस्थित होत्या. शहरातील शिस्तभंग करणाऱ्या रोड रोमिओंवर त्वरित कारवाई करून विद्यार्थिनींच्या सुरक्षेची हमी द्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# लोणी येथील महिलांचे ठाणेदारांना साकडे
## गावातील दारू विक्री बंद करा

**दैनिक युवक आधार**
**आर्णी : देवा पवार**

लोणी गावातील वाढत्या अवैध गावठी दारू विक्रीमुळे त्रस्त झालेल्या लोणी येथील महिलांनी अखेर आपल्या सुरक्षिततेसाठी रस्त्यावर येत आर्णी पोलीस ठाण्याचे दरवाजे ठोठावले. गावातील एका दारू विक्रेत्याने महिलांशी अश्लील वर्तन करत त्यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले असून, याविरोधात महिलांनी एकत्र येत ठाणेदारांना निवेदन देत कठोर कारवाईची मागणी केली आहे. दारू विक्रेत्याचे उघड उघड गुंडगिरीचे प्रकार




महिलांच्या म्हणण्यानुसार, गावातील ठीक ठिकाणी अवैध गावठी दारूची विक्री खुलेआम सुरू असून, संबंधित विक्रेते इतके बिनधास्त आहे की तो महिलांना घरासमोर बसू देत नाही. दिनांक १४ जून रोजी काही महिला आपल्या घरासमोर शांतपणे बसल्या असताना, त्याने त्यांच्या दिशेने अश्लील भाषेत शिवीगाळ केली. "तुमच्या मुळे माझ्या धंद्यावर परिणाम होतो, माझे गिराईक इथे येत नाहीत, तुम्ही येथे बसायचं नाही," असे म्हणत त्याने त्या महिलांना धमकावले. महिलांनी प्रतिवाद करत विचारले की, आम्ही आमच्या घराजवळही बसू शकत नसेल, तर कुठे बसायचे? त्यावर संतप्त होऊन त्याने महिलांसमोर नग्न होण्याचे कृत्य केले.त्याने केले या घटनेनंतर महिलांनी तात्काळ आर्णी पोलीस ठाण्यात जाऊन घटनेची सविस्तर माहिती दिली. लगेच पोलीस घटनास्थळी येऊन संबंधित व्यक्तीला पोलिसांनी ताब्यात घेतले असले तरी काही तासांतच तो घरी परत आला. घरी आल्यावर तो महिलांना पुन्हा धमकी देत असल्याचे महिलांनी सांगितले आहे महिलांनी आपल्या निवेदनात स्पष्टपणे नमूद केले आहे की, जर गावातील गावठी दारू विक्री त्वरित बंद झाली नाही आणि संबंधित आरोपीवर कठोर कारवाई झाली नाही, तर त्या लवकरच उपोषणाला बसतील. मुख्यमंत्र्यांनी आम्हाला बहिणीप्रमाणे मानलं, पण त्यांच्या राज्यात आम्हालाच त्रास होतो आहे. आम्ही फक्त नावालाच त्यांची बहिण राहिलोय का?" असा रोष महिलांनी व्यक्त केला. तसेच गावातील अनेक अल्पवयीन मुलेही या दारूच्या व्यसनात अडकत चालली असल्याने भविष्यात एक नवी सामाजिक समस्या उभी राहण्याचा धोका असल्याचे चित्र सध्या पहायला मिळत आहे

या गंभीर प्रकरणात पोलीस प्रशासन काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण लोणी ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. गावात शांति-सुव्यवस्था राखण्यासाठी आणि महिलांचा आत्मसन्मान जपण्यासाठी तातडीने कडक पावले उचलण्याची गरज आहे. पोलसांनी उपस्थित महिला आश्वासन दिले की लवकरात लवकर दारूबंदी होईल.

## शिवसेना महाराष्ट्र राज्याच्या मुख्य समन्वयक पदी ठाकुर
### करणी सेनेच्या पदाधिकाऱ्यांसह ५११ जणांचा शिंदे सेनेत प्रवेश

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी.**
**रणजीत सिंह ठाकुर**

वाशिम : राजपूत करणी सेना महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष श्यामसिंह ठाकुर यांच्यासह करणी सेनेतील व भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते असे मुंबई विभाग 511 जणांनी आदरणीय श्रीमान एकनाथ शिंदे साहेब यांच्या शिवसेनेमध्ये १७ जून रोजी मुंबई येथे प्रवेश केला. एवढ्या मोठ्या संख्येने एकाच वेळी प्रवेश करणाऱ्यांची ही पहिलीच वेळ असल्याचे प्रतिपादन शिवसेनेच्या उपस्थित सर्व नेत्यांनी केले. हे उल्लेखनीय. श्यामसिंह ठाकुर हे भाजपा उत्तर भारतीय महाराष्ट्र प्रदेश सदस्य तथा भाजपा माजी जिल्हा उपाध्यक्ष व श्री राजपूत करणी सेनेचे प्रदेश अध्यक्ष आहेत. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे प्रमुख आदरणीय महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी श्यामसिंह ठाकुर यांच्यावर राजस्थानि महाराष्ट्र राज्याच्या मुख्य समन्वयक पदाची महत्वाची अशी जबाबदारी टाकली आहे. यावेळी श्यामसिंह ठाकुर म्हणाले




की सन्माननीय शिंदे साहेब यांनी माझ्यावर दाखविलेला विश्वास यासाठी मी पूर्ण पत्र ठरेल असेच शिवसेना पक्ष संघटन आणि विस्तार वाढीसाठी प्रयत्न करीत राहणार. मुख्य नेते मा शिंदे साहेब माझेवर शिवसेना महाराष्ट्र मुख्य समन्वयाची राजस्थानी विभाग महत्वाची जबाबदारी दिली. त्यांनी माझ्यावर दाखविलेला विश्वास हिच माझ्या प्रामाणिकतेची पावती होय . त्याचप्रमाणे आमचे मार्गदर्शक महाराष्ट्र राज्याचे जल व मृद संधारण पालकमंत्री मंत्री आदरणीय संजय राठोड साहेब व विदर्भ कन्या माजी कायम खासदार विधान परिषद आमदार भावनाताई गवळी यांचे आशीर्वाद घेण्याकरिता लवकरच त्याची भेट घेणार असल्याचे श्यामसिंह ठाकुर यांनी आपल्या निवडीनंतर आपले मत व्यक्त केले.

## स्वस्त धान्य दुकानदार कमिशनच्या प्रतीक्षेत : गेल्या सहा महिन्यांपासून कमिशन रखडले

**दैनिक युवक आधार**
**किनवट प्रतिनिधी**
**विशाल भालेराव**

किनवट,दि१८ : तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदार गेली सहा महिने कमिशनपासून वंचित आहेत. कमिशन न दिल्याने खर्च कसा भागवायचा, असा प्रश्न दुकानदार उपस्थित करत आहेत. संघटनेच्या वतीने सातत्याने शासनदरबारी पत्रव्यवहार केला जात आहे. मात्र सकारात्मक निर्णय घेतला जात नाही. तालुक्यातील २०१ स्वस्त धान्य दुकानदारांमार्फत धान्य वाटप केले जाते. सार्वजनिक अन्नधान्य वितरण व्यवस्थेत नागरिकांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतून धान्यपुरवठा केला जात आहे. या योजनेतून स्वस्त धान्य दुकानदारांना दीडशे रुपये प्रतिक्विंटल कमिशन प्राप्त होते. सुरुवातीला दर तीन महिने कमिशन दिले जात होते. काही काळानंतर यात खंड पडला. त्यामुळे कमिशनसाठी रेशन दुकानदारांना चार ते सहा महिने वाट पाहावी लागत आहे. तालुक्यातील दुकानदारांचे जानेवारीपासूनचे कमिशन मिळाले नाही. धान्य वाटपाचे शंभर टक्के लक्ष पूर्ण करण्याचे उद्दिष्ट धान्य दुकानदारांना देण्यात येते. मात्र, याच दुकानदारांचे कमिशन रखडले आहे. कमिशन न मिळाल्यास खर्च कसा भागवायचा. वीजबिल व इतर खर्चाची चिंता दुकानदारांना आहे. शासनाने सकारात्मक लक्ष देण्याची मागणी होत आहे. ||कमिशन रखडल्याने स्वस्त धान्य दुकानदार आर्थिक अडचणीत आहेत. त्यांना उत्पन्नाचे दुसरे साधन नसल्याने उपजीविका चालविणे अवघड होत आहे. राज्य सरकारसोबत झालेल्या बैठकीतील निर्णयावर कार्यवाही केली जात नसल्याचा फटका रेशनिंग दुकानदारांना बसत आहे.||

**- मिलिंद सर्पे, महासचिव, रेशन व केरोसीन दुकानदार महामंडळ, नांदेड जिल्हा**

# यांत्रिकीकरणात हरवते 'सर्जा- राजा''ची जोडी !
### आधुनिक युगात शेती कामात बैलाऐवजी ट्रॅक्टर, पॉवर टिलरचा वापर वाढला

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण (प्रतिनिधी):--**

पूर्वी शेतातील कामे म्हणजे आपल्या सर्जा-राजाची बैलाची जोडी असे समीकरण ठरले होते. चल रे सर्जा... अशी गाणी, शेतकरी आपल्या लाडक्या बैलांना हाक मारून शेतातील कामे करीत असे. मात्र, आता काळ बदलत चालला आहे. शेतकऱ्याच्या घरासमोरील अंगणाची शोभा वाढवणारी बैलगाडी यांत्रिकीकरणाच्या युगात दुर्मीळ होत चालली आहे. यांत्रिकीकरणाचा परिणाम शेतीवरही झाला आहे.

कोकणातील रत्नागिरीसह अन्य जिल्ह्यातही शेतामध्ये बैलाऐवजी ट्रॅक्टर, पॉवर टिल्लर यांचा सर्रास वापर सुरू झाला आहे. बैलासह गाड्यांच्या किंमती वाढल्यामुळे शेतकऱ्याला बैल पाळणे परवडते नाही. त्यामुळे ट्रॅक्टर,



पॉवर टिल्लरचा वापर वाढला आहे. पूर्वी शेतीमध्ये सर्जा-राजाची बैलजोडी ही हमखास असायची. पाऊस पडला कि पिकांच्या पेरणीसाठी बैलगाडीतून शेतकरी शेतात जायचा. शेतातील नांगरणी, पेरणी यासह अनेक कामे बैलाकडून करून घेतली जायची. लोकांचा बैलगाडीतून गावाला, देवाला प्रवास हा ठरलेलाच असायचा. शेतकरी व कुटूंब मोटारसायकल, चारचाकी ऐवजी बैलगाडीतून प्रवास करायचे. बैलगाडीतील प्रवास हा आगळा वेगळा आनंद असायचा. आता शहराबरोबरच यांत्रिकीकरण वाढले साहजिकच पारंपारिक पद्धतीने केल्या जाणाऱ्या शेतीमध्ये आधुनिकता आली. बैलजोडीने केली जाणारी कामे आता ट्रॅक्टरने, पॉवर टिलरने सर्रास केली जात आहेत. पूर्वी साखर कारखान्याच्या ठिकाणी साखर हंगामात बैलगाडीने ऊस वाहतूक मोठ्या प्रमाणात केली जायची. ऊस वाहतूक करणाऱ्या बैलगाड्यांच्या रांगांच्या रांगा लागलेल्या असायच्या. मात्र आता यांत्रिकीच्या जमान्यात ट्रॅक्टरद्वारे उसाची वाहतूक सुरू आहे. शेतातील कामासह अन्य कामासाठी शेतकरी, तरूणाई आता यांत्रिकीकरणाचा आधार घेत आहे.

**बैलजोडी पाळणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही गड्या**

बैलगाडी कमी होण्याची कारण पूर्वी प्रत्येक प्रकारची वैरण असायची. ती सहजासहजी उपलब्ध व्हायची. पण, आता वैरण महाग झाली आहे. त्यामानाने बैलजोडीला कामे मिळताना मर्यादा येत आहेत. काम मिळाले तर त्या मानाने पैसे मिळत नाहीत. परिणामी, बैलजोडी पाळणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. त्यामुळे शेतातील कामे करण्यासाठी बैलाऐवजी यांत्रिकीकरणाचा आधार घेत आहेत. जुनी मंडळी, शेतकऱ्यांकडे 'सर्जा राजाची' जोडी पाहायला मिळते.

**शर्यतीसाठी वापर**

शेतातील कामासाठी व अन्यकामासाठी शेतकरी आता बैलाचा वापर करीत असला तरी शर्यतशौकीन युवकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे कित्येकजण बैलखरेदी करीत आहेत. ३ ते ४ लाखांपर्यंत बैल विक्री होत आहे. छकड्याची किंमत २० ते ३० रुपयांना आहे. मात्र बैलांचा वापर शेतीच्या कामाऐवजी शर्यतीसाठी वापरले जात आहे.

# परळीतील व्यसनमुक्तीसाठी लढणाऱ्या पत्रकारांचा करण्यात आला गौरव
### दीपक नाना देशमुख यांच्या संस्थेचा अभिनव उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**मारुती सत्रे**
**बीड जिल्ह्या प्रतिनिधी**

परळी शहरातील व्यसनाधीन अल्पवयीन मुलांवर गंभीर स्वरूपात परिणाम होत आहेत. गतीमान जीवनशैलीत वाढती व्यसनाधीनता हे समाजासाठी चिंतेचे कारण ठरत आहे. विशेषतः अल्पवयीन मुलांमध्ये व्यसनाची लागण ही भविष्यासमोरील एक गंभीर आपत्ती बनली आहे. या पार्श्वभूमीवर परळी शहरात सप्तशृंगी दुर्गा सेवाभावी संस्था आणि व्यसनमुक्ती केंद्र व नर्सिंग कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या व्यसनमुक्ती च्या लढ्यास सप्तशृंगी दुर्गा सेवाभावी संस्थेच्यावतीने दैनिक पुण्यनगरीचे ज्येष्ठ पत्रकार धनंजय आरबुने आणि अतुल्य महाराष्ट्र न्यूज नेटवर्कचे संपादक नितीन ढाकणे यांनी व्यसनाधीनतेविरोधात केलेले निर्भीड वृत्तांकन आणि समाजहिताचा आवाज बनलेल्या लिखाणामुळे त्यांना हा गौरव करण्यात आला. सत्कार प्रसंगी नितीन चव्हाण, पत्रकार अनंत कुलकर्णी तसेच संस्थेचे पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. व्यसनमुक्तीसाठी सुरू असलेल्या कार्यात माध्यमांनी घेतलेली सक्रिय भूमिका



हीच खऱ्या अर्थाने सामाजिक परिवर्तनाची ग्वाही असून

व्यसनमुक्तीचा लढा हा केवळ सरकारी यंत्रणांचा नव्हे, तर प्रत्येक सुजाण पत्रकाराचाही असल्याचे दीपक नाना देशमुख यांनी यावेळी स्पष्ट केले.

याच कार्यक्रमात संस्थेच्या वतीने व्यसनमुक्ती, स्वच्छता आणि परळीतील मुलभूत प्रश्नांवर लेखन व जनजागृती करणाऱ्या पत्रकार,आणि माध्यमांना विशेष प्रोत्साहन देण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली.

**यामध्येः**

प्रथम क्रमांकासाठी ₹५१,००० व सन्मानचिन्ह
द्वितीय क्रमांकासाठी ₹२१,००० व सन्मानचिन्ह
तृतीय क्रमांकासाठी ₹११,००० व सन्मानचिन्ह

असे बक्षिसांचे नियोजन असल्याचे एका अधिकृत आवाहनाद्वारे दीपक नाना देशमुख यांनी जाहीर केले. "माध्यमांनी समाजात फक्त बातम्या दाखवू नयेत, तर दिशा दाखवावी, आणि व्यसनमुक्तीच्या लढ्यात हेच पत्रकार आमचे खरे सामाजिक सुधारणेसाठी करत असलेले कार्य हे प्रभावी ठरत आहे," असे उद्गार देखील त्यांनी यावेळी काढले. हा उपक्रम परळीच्या सामाजिक जाणीवेचे प्रतीक ठरून इतर संस्थांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

## जाहीर नोटीस

**नियम ७ अ प्रमाणे**

सहाय्यक धर्मादाय आयुक्त रागड विभाग अमिक्षाग यांचे कार्यालय कल्पनरु इमारत, चौष्ट फिजवळ, अलिबाग, जि. राशन

**अर्ज क्रमांक :- २३८/२०२५**

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :- " रामदास पाटील शैक्षणिक एवं सामाजिक ट्रस्टत..
श्री. रामदास हरिश्चंद्र पाटील अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की.

सहायक धर्मादाय आयुक्त रायगड विभाग रायगड हे वर नमूद केलेला नोंदणी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्ययांवर

**चौकशी करणार आहेतः-**

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
(अ) जंगम मिळकत :- (वर्णन) रोख रक्कम १,०००/-रुपये
(ब) स्थावर मिळकत : (वर्णन) काही नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावाची असेल अगर त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे, नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाल बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहिनिशी व मी सहायक धर्मादाय आयुक्त रायगड अलिबाग यांचे शिक्कयानिशी आज दिनांक १६.०६.२०२५ रोजी दिली.

**अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**रायगड विभाग, रायगड**

## रिसोड तालुका शिवसेना (ऊ. बा. ठा.) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या महत्तवपूर्ण बैठकीचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी.**
**रणजीत सिंह ठाकुर**




दि.२२ जुनं रोजी रविवारी सकाळी ११ वा.रिसोड तालुक्यातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन रिसोड येथील विश्वा लॉन, मालेगाव रोड येथे शिवसेना जनसंपर्क कार्यालयात, रिसोड विधानसभेचे सहसंपर्कप्रमुख विश्वनाथ सानप व उपजिल्हाप्रमुख डॉ.चंद्रशेखर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात येणार आहे. त्यामध्ये जिल्हा परिषद, पंचायत समिती,नगरपरिषद निवडणूक संदर्भात आढावा, पक्षात नविन पदाधीकारी निवडी, नविन पक्षप्रवेश आदी विषयांवर चर्चा होणार आहे. तरी रिसोड तालुक्यातील तथा शहरातील सर्वच शिवसेना, युवासेना, महिला आघाडी पदाधिकारी व शिवसैनिक या बैठकीला उपस्थित राहावे.असे आवाहन शिवसेना रिसोड तालुका प्रमुख नारायण आरू व शहर प्रमुख संजय इरतकर युवा सेना तालुकाप्रमुख गजानन सानप व युवासेना शहर प्रमुख कैलास ठोकरे महिला आघाडी तालुका यांचे वतीनेउपस्थीत राहण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे.

# उरण क्रिकेट समालोचक असोशियन तर्फे मुलींना अर्थसहाय्य

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी .**



चिर्ले येथील उरण क्रिकेट समालोचक असोशियनच्या वतीने बारावी मध्ये शिक्षण घेत असलेल्या गरीब गरजू विद्यार्थिनींसाठी अर्थसहाय्य योजना राबविण्यात आली आहे. यावर्षी 11 मुलींना आणि आत्तापर्यंत 52 मुलींना असोशियनने अर्थसाहाय्यातून मदतीचा लाभ दिला आहे. असे असोसिएशनचे अध्यक्ष प्रसाद भोईर यांनी प्रास्ताविकेतून सांगितले. विशेषतः क्रिकेट समालोचन करताना अनेक दानशूर व्यक्तींकडून असोसिएशनला अर्थसाहाय्य केले जाते. या मिळणाऱ्या रकमेच्या मानधनातून 10 टक्के रक्कम हि सामाजिक कार्यासाठी वापरली जावी हा असोशियनचा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे बारावीमध्ये शिकणाऱ्या मुलींना या असोशियन तर्फे आर्थिक मदत केली जाते. या कार्यक्रमाचे आयोजन चिर्ले येथील श्रीराम मंदिरात करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी भूषविले होते. यावेळी घरत यांच्या हस्ते तसेच अन्य मान्यवरांच्या हस्ते मुलींनाअर्थसहाय्य देऊन, त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी अध्यक्षीय भाषणात महेंद्र घरत यांनी असोसिएशनच्या कार्याचे मनापासून कौतुक करून, माझ्याकडून जेवढी मदत करता येईल ती मी करीत राहीन, अशी यावेळी त्यांनी ग्वाही दिली. तसेच यावेळी त्यांनी 51 हजार रुपयाची असोशियनला आर्थिक मदत देखील दिली. याप्रसंगी उपस्थित असलेल्या दीपक ठाकूर व नितेश पंडित यांनी आपल्या मनोगतातून असोसिएशनच्या कार्याची स्तुती केली. तर व्यासपीठावर उपसरपंच श्रीकांत पाटील, सामाजिक कार्यकर्ते सुनील मढवी, धुतूमचे सदस्य प्रेमनाथ ठाकूर, जासई माजी सदस्य मुरलीधर ठाकूर, जसखार सदस्य हेमंत ठाकूर, गोपीनाथ म्हात्रे, रायगड भूषण नितेश पंडित, पपन पाटील, चंद्रशेखर ठाकूर, मनीषा घरत, मयूर म्हात्रे, चैतन्य पाटील, अँड. दिग्रस पाटील, उरण तालुका सरचिटणीस विवेक म्हात्रे, उरण युवक इंटक विधानसभा अध्यक्ष राजेंद्र भगत, अमय पितळे उपस्थित होते. यावेळी पाहुण्यांचे स्वागत संस्थेचे उपाध्यक्ष विपुल पाटील, सल्लागार आत्माराम म्हात्रे, खजिनदार प्रल्हाद कासूकर , सदस्य संयम घरत, प्रवीण म्हात्रे, हितेश म्हात्रे, सुरज पाटील, नवनाथ म्हात्रे, जगदीश ठाकूर, विराज मढवी, पिंट्या घरत यांनी केले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे पदाधिकारी ,सदस्य, पालक वर्ग यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन उपाध्यक्ष विपुल पाटील यांनी केले. तर आभार अध्यक्ष प्रसाद भोईर यांनी व्यक्त केले.

## गिरगावच्या सुप्रसिद्ध चिकित्सक समूह शिरोळकर हायस्कूलचा शानदार प्रवेशोत्सव.

**दैनिक युवक आधार**
**मुबंई प्रतिनिधी**




16जुन 2025 या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी सर्व विद्यार्थ्यांचे जोरदार स्वागत ढोल ताशांच्या गजरात व औक्षण करून करण्यात आले. प्रवेशद्वारातून आत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यास गुलाब पुष्प देण्यात आले. या दिवशी मुंबई परिसरात पावसाने जोरदार हजेरी लावली होती तरीही विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते याबाबत संस्थेचे अध्यक्ष श्री किशोर रांगणेकर सर व सचिव डॉक्टर गुरुनाथ पंडित सर यांनी समाधान व्यक्त केले. शाळेच्या प्रवेशद्वारावरच शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती संचिता गावडे ,पर्यवेक्षक श्री. संतोष मांजरेकर,सर्व शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या

## सामाजिक भव्यदिव्य गुणगौरव सोहळा आयोजन - श्री दिलीप किसनराव आमले..

**दैनिक युवक आधार**
**नेरुळ वार्ताहर**




त्रिमूर्ती मित्र मंडळ आयोजित दहावी बारावी विद्यार्थी अनेक सामाजिक संस्था पदाधिकारी ज्येष्ठ नागरिक सोसायटीतील अनेक पदाधिकारी गणपती बाप्पा मंडळे विभागातील डॉक्टर आदर्श पुरुष आदर्श महिला आदर्श सन्माननीय उद्योजक आदर्श वाहन चालक या सर्वांचा भव्य दिव्य गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आलेला आहे सर्व दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांना विनंती कृपया दिनांक 21/ 6/ 2025 रोजी पाच वाजेपर्यंत आपली नाव नोंदणी करून भव्य दिव्य गुणगौरव सोहळा या कार्यक्रमांमध्ये सर्व क्षेत्रातील ज्येष्ठ श्रेष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे अशी त्रिमूर्ती मित्र मंडळ संस्थापक अध्यक्ष श्री दिलीप किसनराव आमले आपला माणूस प्रमुख मार्गदर्शक व्यसनमुक्ती जनजागृती यांच्या वतीने आव्हान करण्यात आलेले आहे नाव नोंदणी आपला माणूस वाहतूक सेवा मध्यवर्ती कार्यालय सेक्टर 6 येथे करण्यात येत आहे

## रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकरमहाविद्यालयातील

### माजी विद्यार्थी संघाच्या वतीने वृक्षारोपण संपन्न.

**दैनिक युवक आधार कॉलेज**
**कट्टा/आरती सुरवसे**



17 जून 2025 रोजी फुंडे महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघाच्या वतीने विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले.स्वा. वीर सावरकर माध्यमिक व ज्युनियर कॉलेज नवीन शेवे येथे व तु. ह.वाजेकर माध्यमिक व ज्युनिअर कॉलेज फुंडे येथे माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष व जनरल बॉडी सदस्य मा.सुधीर घरत,मा. जीवन भोईर सचिव स्वा.वीर सावरकर विद्यालय नवीन शेवे,प्राचार्य,संतोष म्हात्रे,प्राचार्य,बबन साळुंखे,प्र-प्राचार्य,डॉ. आमोद ठक्कर यांचे हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.झाडे लावा,झाडे जगवा या महाराष्ट्र शासन मिशन योजनेचा भाग म्हणून दरवर्षी फुंडे महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी संघ वृक्षारोपण करीत असतात.या प्रसंगी प्रा.राम गोसावी,प्रा. माने,प्रा.खेडकर तसेच महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक,राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

## खांदा कॉलनीत रिकामा भूखंड बनला कचरा कुंडी

**दैनिक युवक आधार**
**खांदा कॉलनी**
**राजेंद्र कांबळे**



खांदा कॉलनी परिसरात सेक्टर 9 येथील रिकामा भूखंड सध्या कचराकुंडी बनला असल्याचे दिसत आहे या परिसरातील रोज बाजार मधील अनेक दुकानदार आपला कचरा कचरा कुंडीत न टाकता रिकाम्या भूखंडावर टाकत असलयाचे दिसत आहे पनवेल महापालिका देखील या भूखंडाच्या कचऱ्यावर लक्ष न देत असल्याचे दिसत आहे सिडको चाहा भाग पनवेल महापालिकेच्या नियंत्रणात आल्यानंतर पनवेल माहापालिकेच्या स्वच्छता विभागांनी या परिसरात कचराकुंड च्या घंटागाडी सकाळ संध्याकाळ असे दोन वेळा फिरू लागल्या आहेत तरी देखील रोज बाजार परिसरातील काही दुकानदार आपला कचरा या भूखडावर टाकताना दिसत आहेत त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरून रोगराई पसरण्याची भीती आहे पनवेल महापालिकेच्या स्वच्छता विभागाने या परिस्थितीत समस्या कडे लक्ष द्यावे अशी या परिसरातील नागरिकांची मागणी आहे

# ग्रामपंचायत बोरगाव सारवणी येथे एक दिवस गावकऱ्या सोबत नाविन्यपूर्ण कार्यक्रम संपन्न.

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी :- योगेश पालोदकर




सिल्लोड :- तालुक्यातील बोरगाव सारवणी येथे 18 जून 2025 रोजी मा.विभागीय आयुक्त,आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर,मा. जितेंद्र पापळकर यांच्या संकल्पनेतून तसेच मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर मा. अंकित व गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड मा.रत्नाकर पगार यांच्या मार्गदर्शनाखाली उपसरपंच मोहसिन बुढन पटेल यांच्या अध्यक्षतेखाली सर्व विभाग प्रमुख यांच्या उपस्थित ग्राम दरबार भरून एक दिवस गावकऱ्यासोबत हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आला.केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांच्या मार्फत राबविल्या जाणाऱ्या सर्व विभागातील विविध योजनांचे निकष व माहिती जनसामान्यांना देऊन, त्याची प्रसिद्धी करण्यात आली. यावेळी ग्रामस्थांशी संवाद साधून, गावात सुबक्ता आणायची असेल तर गाव जलसमृद्ध असले पाहिजे असे प्रतिपादन केले. प्रत्येक शेतकऱ्यांनी वैयक्तिक शोष खड्ड्याचे प्रस्ताव भरावे व शेतातून वाहून जाणारे पाणी शेतातच जिरवावे, शेताची बांधबंधिस्ती करावी जेणेकरून गाव जलसमृद्ध होईल व मगच गावाचा सर्वांगीण विकास साधता येईल यासाठी प्रत्यक्ष शेतकऱ्यांनी शोष खड्डा करण्याचे प्रस्ताव सादर करावे असे आवाहन केले. पाणी अडवा व पाणी जिरवा असे ग्रामस्थांना संबोधित केले. तसेच गावकऱ्यांच्या अडीअडचणी समजून त्या सोडवण्याचा प्रयत्न करण्यात आला. भारतातील 65 टक्के लोकसंख्या ही ग्रामीण भागात वास्तव्य करून राहते. गावाचा सर्वांगीण व शाश्वत विकास होण्याच्या दृष्टिकोनातून व गावकऱ्यांना विविध योजनांचा लाभ मिळावा व गावाचा विकास व्हावा हा जनसामान्याचा मानस असतो त्या अनुषंगाने ग्राम दरबार हा नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. यावेळी उपअभियंता पाणी पुरवठा, अप्पासाहेब काटकर , बालविकास प्रकल्प अधिकारी सुनीता सनान्से, विस्तार अधिकारी पंचायत अण्णासाहेब गाडेकर,विस्तार अधिकारी कृषी, जोगेंद्र अहिरराव, राजेंद्र लांडगे विस्तार अधिकारी आरोग्य समाधान जाधव,सिंचन विभाग कनिष्ठ अभियंता श्रीमती. धनश्री बागुल, श्रीम.एस.एम. राठोड, स्वच्छ भारत मिशन ग्रामीण गट समन्वयक केशवकांत बुलबुले,सोपान भालके शाखा अभियंता बांधकाम डी के जाधव, अंगणवाडी पर्यवेक्षिका श्रीमती. एस एस बोरसे, महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियान चे तालुका अभियान व्यवस्थापक संदीप कापसे,प्रभाग समन्वयक काशिनाथ पंडित,केंद्र प्रमुख सुनिल डोके ,समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.सागर तांबे ,पशुधन पर्यवेक्षक श्रीमती.एस.डी. **तवर,कृषी सहाय्यक श्रीमती** मेधा सोमवंशी ,वरिष्ठ तंज्ञ वायरमन पाशु बाबु शहा,गृहनिर्माण अधिकारी पवन डोईफोडे, माजी उपसभापती शेख रब्बानी, ग्रामपंचायत अधिकारी शिवाजी गायके, सदस्य, तसेच सर्व विभागाचे विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी तसेच गावातील आजी-माजी लोकप्रतिनिधी, प्रतिष्ठित नागरिक व गावकरी,पत्रकार मंडळी उपस्थित होते.

# रायगड जिल्ह्यात पहिल्यांदाच स्ट्रोक प्रतिबंधासाठी ८० वर्षीय रुग्णावर यशस्वी उपचार

### वॉचमन एफएलएक्स डिव्हाइसचे यशस्वी प्रत्यारोपण

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई:प्रतिनिधी**



मेडिकव्हर हॉस्पिटलमधील वरिष्ठ इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजिस्ट आणि व्हॉल्व्ह तज्ञ डॉ. अनुप महाजनी यांच्या नेतृत्वाखालील टिमने नवी मुंबई आणि संपूर्ण रायगड जिल्ह्यात पहिल्यांदाच वॉचमन एफएलएक्स डिव्हाइस इम्प्लांटेशन करण्यात आले आहे. एका ८० वर्षीय रुग्णावर ही यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. रुग्ण क्रॉनिक ॲट्रियल फायब्रिलेशन (एएफ) ग्रस्त होती आणि रक्त पातळ करणाऱ्या औषधांमुळे (इंट्राक्रॅनियल हेमोरेज, म्हणजेच कवटीत रक्तस्त्राव) सारख्या जीवघेण्या गुंतागुंतींचा सामना करत होता. कलकत्ता येथे राहणाऱ्या ८० वर्षीय रुग्णाला स्ट्रोक प्रतिबंधासाठी उपचाराकरिता* दिलेल्या अँटीकोएगुलेशनमुळे अंतर्गत रक्तस्त्राव झाला होता. ते डॉ. महाजनी यांच्याकडे उपचारासाठी आले. सुरुवातीला रक्तस्त्रावामुळे मेंदूचा दाब कमी करण्यासाठी क्रॅनियोटॉमी करण्यात आली. एका आठवड्यानंतर रुग्णाच्या तब्येतीत काहीशी सुधारणा झाली. स्ट्रोक टाळण्यासाठी या रुग्णाला अँटीकोएगुलेशन द्यावे लागत होते मात्र त्यामुळे होणाऱ्या अंतर्गत रक्तस्त्रावामुळे ते थांबविण्याचा निर्णय घेण्यात आला. ॲट्रियल फायब्रिलेशनमुळे स्ट्रोकचा धोका कमी करण्यासाठी तो सामान्यतः लिहून दिलेले ओरल अँटीकोएगुलेंट घेत होता. त्याला ॲस्पिरिन पोस्ट-एंजिओप्लास्टी (पीटीसीए) सारख्या अँटीप्लेटलेट औषधांची देखील आवश्यकता होती, परंतु अँटीकोएगुलेंट्स पुन्हा सुरू केल्याने मेंदूतील रक्तस्त्रावाचा धोका वाढू शकतो. रक्तस्त्रावाचा धोका असूनही, रुग्णाला कार्डिओएम्बोलिक स्ट्रोक, हृदयरोगाचा उच्च धोका होता. या गुंतागुंतीच्या आव्हानांना तोंड देत, मेडिकव्हर हॉस्पिटलमधील डॉ. अनुप महाजनी यांच्या* नेतृत्वाखाली टीमने लेफ्ट ॲट्रियल अपेंडेज ऑक्लुजनसाठी वॉचमन एफएलएक्स डिव्हाइस इम्प्लांटेशन हे एक नवीन व प्रभावी उपचार पर्याय निवडले. एलएए हा हृदयातील एक लहान थैली आहे जिथे एएफ रुग्णांमध्ये अनेकदा गुठळ्या तयार होतात. टीईई (ट्रान्ससोफेजियल इकोकार्डियोग्राफी) आणि फ्लोरोस्कोपीतंर्गत फेमोरल शीरेतून विशेष उपकरणाचा घालून या भागाला बंद करून, टीमने रुग्णामध्ये दीर्घकालीन भासणारी अँटीकोएगुलेशनची आवश्यकता दूर केली. हे उपकरण ॲट्रियल फायब्रिलेशन असलेल्या रुग्णांसाठी एक जीवनरक्षक ठरते. अट्रियल फिब्रिलेशन ही एक अनियमित आणि अनेकदा अतिशय जलद हृदयाची लय आहे (अरिदमिया) ज्यामुळे हृदयात रक्ताच्या गुठळ्या होऊ शकतात. वॉचमन एफएलएक्स डाव्या ॲट्रियल अपेंडेजला कायमचे बंद करण्यासाठी डिझाइन केले आहे, ज्यामुळे ओपन हार्ट सर्जरीची आवश्यकता न भासता स्ट्रोकचा धोका कमी होतो. ही प्रक्रिया १ तासाच्या आत सुरक्षितपणे पूर्ण झाली, कोणत्याही गुंतागुंतीशिवाय, रुग्ण आता पूर्णपणे बरा होत असल्याची माहिती डॉ. अनुप महाजनी यांनी दिली डॉ. अनुप महाजनी पुढे सांगतात की,* पारंपारिक ओपन हार्ट सर्जरीच्या तुलनेत यामध्ये कोणत्याही मोठ्या जखमा होत नाहीत, रुग्ण जलद बरा होतो आणि संसर्ग किंवा गुंतागुंतीचा धोका देखील कमी असतो. हे विशेषतः वयस्कर किंवा कोमॉर्बिडीटिज असलेल्या रुग्णांसाठी योग्य ठरतात. या ४ दिवसांच्या प्रक्रियेनंतर रुग्णाला घरी सोडण्यात आले. मेडिकवर हॉस्पिटलमध्ये सर्व प्रकारचे प्रगत उपचार पुरविले जातात. नवी मुंबईत पहिल्यांदाच वॉचमन FLX डिव्हाइस इम्प्लांटेशन यशस्वीरित्या पार पडले असून हृदयरोगाच्या काळजीसाठी हे एक नवीन बेंचमार्क प्रस्थापित करते. पारंपारिक रक्त पातळ करणाऱ्या उपचारांना सहन न करणाऱ्या असंख्य रुग्णांकरिता हे एक आशेचा किरण ठरत आहे. स्ट्रोक टाळण्यासाठी हा एक सुरक्षित आणि अधिक प्रभावी पर्याय ठरत आहे.

## शिक्षक नेमणे आहे

दि. 18 जून 2025: 'हुतात्मा परशुराम रामा पाटील शिक्षण संस्थेचे', पुंडलिक रामा पाटील इंग्लिश स्कुल पाणदिवे, उरण या शाळेत शिक्षक नेमणे आहेत. नर्सरी ते दहावी पर्यंत येथे विद्यार्थी शिकविले जातात. गुणवत्तापुर्ण शिक्षण,सुसज्ज इमारत, नियोजनबद्ध शिक्षण पद्धती, शिस्त,माफक फी तसेच सर्व सुख सोयी उपलब्ध असणारी उत्कृष्ट इंग्रजी माध्यमाची शाळा म्हणून उरण पूर्व विभागात पाणदिवे शाळेकडे पालकांचा कल वाढलेला आहे.

शैक्षणिक वर्ष 2025-26 मध्ये शाळेत अनेक विद्यार्थ्यांचे प्रवेश वाढले आहेत. त्यामुळे नव्या शिक्षकांची गरज आहे. B. SC, B. A. B. ED, D. EDकिंवा अनुभव तज्ज्ञ व्यक्तींनी लवकरात लवकर शाळेच्या कार्यालयाला भेट द्यावी. काही कारणास्तव प्रत्यक्ष भेट देणे अशक्य असल्यास शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती योगिता गावंड मॅम यांना या 9773556226 क्रमांकावर त्वरित संपर्क साधावा.

**कार्यलयीन पत्ता :-**
**पी. आर. पी. इंग्लिश स्कुल पाणदिवे,**
**ता. उरण, जि. रायगड,**
**पिन कोड- 410206.**

## गहाळ झालेले सहा मोबाईल सापडण्यात पोलिसांना यश

### पोलीस निरीक्षक शितल मालटे एक्शन मोडवर

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी**
**:-जितेंद्र खोडे**

राळेगावः-पोलीस स्टेशन राळेगाव येथे नोंद असलेले रस्त्यात पडलेले किंवा चोरीला गेलेले ६ मोबाईल शोधण्यात पोलीस स्टेशन राळेगाव यांना यश आले आहे. त्यानुसार बुधवारी यातील काही जणांचे मोबाइल प्राप्तनिधीक स्वरुपात हस्तांतरीत करण्यात आले असल्याची माहिती पोलीस निरीक्षक शितल मालटे यांनी दिली. मागील काही महिन्यात नागरीकांचे मोबाइल फोन हरविण्याचे प्रमाण वाढल्याने त्या संदर्भात पोलीस स्टेशन राळेगाव यांनी इतर वरीष्ठांनी हरविलेली मालमत्ता शोधून ती संबधीत नागरीकांना परत करण्याबाबत आदेशीत केले. त्या अनुषंगाने पोलीस स्टेशन पथकाकडून वेबसाईटच्या आधारे नागरीकांचे हरविलेल्या मोबाइल फोनची माहिती मिळवून त्याबाबत तांत्रिक तपास करुन ६ मोबाइल शोधून काढले आहेत.त्यामध्ये वन प्लस, विवो, रिअलमी,ओप्पो,मोट्रोला,रेडमी अशा सहा कंपन्याचे मोबाईल बुधवारी त्याचे प्राप्तनिधीक स्वरुपात काही मालकांना ते मोबाइल परत देण्यात आले आहेत. राळेगाव परिसरातील नागरीकांना यावेळी आवाहन करण्यात आले असून ज्यांचे मोबाइल गहाळ झाले असेतील त्याची माहिती जवळच्या पोलीस ठाण्याला किंवा वेबसाईटवर अपलोड करावी असे आवाहनही यावेळी करण्यात आले आहे. सदरची कार्यवाही पोलीस निरीक्षक शितल मालटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार सुरज चिव्हाणे यांनी केली.



सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## कस्तुरबा गांधी शाळेच्या प्रकरणात तहसीलदार गटशिक्षणाधिकाऱ्यांचे मौन

### जिल्हाधिकारी याकडे लक्ष देऊन चौकशी करून बदली करतील का?

**दैनिक युवक आधार**
**बिलोली (प्रतिनिधी )** बिलोली येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात माहे एप्रिल 2024 ते माहे जानेवारी 2025 या 10 महिन्यात 35,79,944/- रुपयांचे निधी आले असल्याचे माहिती अधिकारातून माहिती मिळाले आहे. सदरील निधीचा वापर कुठे कूठे करण्यात आले आहे. त्याचबरोबर कशा पद्धतीने कशावर किती खर्च करण्यात आले याच्या आराखड्या सहित माहिती मिळाली नाही. त्याची सविस्तर वार्षिक आराखड्याचे तसेच अहवालाचे छायाकित सत्यप्रती देण्यात यावे याबाबत माहिती मागितले असता सदरील बाबतीत चौकशी करण्यासाठी तहसीलदार तसेच गटशिक्षणाधिकारी यांना पत्र दिले असता अद्याप पर्यंत कुठल्याही प्रकारची चौकशी करण्यात आले नाही. चौकशी केल्याच्या आराखडा सहितचे अहवाल मिळाले नाही. अनेक कर्मचारी बऱ्याच वर्षापासून इथेच कार्यरत आहेत. शासकीय नियमांचे उल्लंघन करत या ठिकाणी अनेक वर्षापासून असणाऱ्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची बदली करण्यात यावे. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील प्रत्येक विद्यार्थिनीच्या जेवणावर, स्टेशनरीवर, आठवड्याच्या खाण्याच्या मेनुसहित तसेच इतर किती खर्च केला जातो, त्याचे सविस्तर मासिक तसेच वार्षिक आराखड्यासहित सत्यप्रतीत माहिती देण्यात यावी. संबंधित आलेले निधीचा योग्य प्रकारे नियोजन होतो का याची एक समिती नेमून सखोल चौकशी करून वरील माहितीचे अहवाल देण्यात यावे अशा प्रकारचे पत्र दिनांक 13 मे रोजी बिलोली चे तहसीलदार तसेच बिलोली गटशिक्षणाधिकारी यांना दिले होते. शाळेच्या मुख्याध्यापिका तब्बल चार पदे सांभाळत आहेत, असे कोणत्या शासकीय नियमात आहे की एक व्यक्ती चार पदे सांभाळू शकतो का असा सवाल करण्यात आले आहे. तसेच गेल्या 13 वर्षापासून याच शाळेवर कोणत्या शासकीय नियमानुसार आहेत, एकाच ठिकाणी तेरा वर्षापासून राहता येते का? हे नियमबाह्य असेल तर तात्काळ यांची चौकशी करून त्यांची बदली करण्यात यावे. तसेच दोषी आढळल्यास निलंबनाची कारवाई करण्यात यावी अशा प्रकारचे मागणी बिलोली शहरातील माहिती अधिकार तसेच सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मीकांत कलमुर्गे यांनी केले आहेत.

**आपला**
**लक्ष्मीकांत कलमूर्गे**
**रा. रवींद्रनगर, बिलोली**
**8888087513**

## विद्यार्थ्यांचे औक्षण, गुलाबपुष्पांनी स्वागत – शिरवाडे वाकद शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**
शिरवाडे वाकद :- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मॉडेल स्कूल, शिरवाडे वाकद येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा प्रवेशोत्सव मोठ्या आनंदात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेच्या अंगणात बालकांच्या चिमुकल्या पावलांनी पुन्हा एकदा नवचैतन्य फुलले! गावकऱ्यांच्या उत्स्फूर्त स्वागतात शाळेच्या प्रवेशद्वारापाशी औक्षण करत, गुलाबपुष्प, चॉकलेट आणि मिठाई देऊन प्रत्येक नवागताचं मनोभावे स्वागत करण्यात आलं. ज्ञानाच्या मंदिरात त्यांच्या 'पहिल्या पावलां'चा हा क्षण अविस्मरणीय ठरला.

कार्यक्रमास गावाचे सरपंच श्रीकांत आवारे, उपसरपंच सौ.कविता आवारे, शिक्षणतज्ज्ञ किरण आवारे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आशिष आवारे, सोपान शिंदे, अशोक चिताळकर, नाना भालनोर तसेच समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते. उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, पाठ्यपुस्तके, बूट व सॉक्सचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी खास आकर्षण ठरलं ते प्रधानमंत्री पोषण योजनेतून मिळालेलं 'वाटाणा पुलाव', ज्याने चिमुकल्यांची भूक भागवली आणि मनही प्रसन्न केलं. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन पाटील सर यांनी तरल भाषेत केलं. शाळेचे मुख्याध्यापक यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी साळवे सर, सौ. सोनवणे मॅडम, सौ.महाजन मॅडम आणि जाधव सर यांनी परिश्रम घेतले.



## माना दास कॅश काऊ फिन्सर्व्ह प्रा.लि.यांचे मार्फत कोळंब शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप

**दैनिक युवक आधार**
**राजापूर :- (प्रमोद तरळ)**
माना दास कॅश काऊ फिन्सर्व्ह प्रा. लि. यांचे मार्फत राजापूर तालुक्यातील जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा कोळंब या शाळेतील इयत्ता पहिली ते सातवी पर्यंत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना मोफत दप्तर,वह्यां आणि कंपास पेटी या शैक्षणिक साहित्याचे वाटप नुकतेच कोळंब येथे करण्यात आले. कोळंब ग्रामविकास मंडळाचे अध्यक्ष धोंडू बुवा पाटेकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि माना दास कॅशकाऊ फिन्सर्व्हचे संस्थापक मानाजी धावले, आत्माराम धावले,महेश सोनकर,गोरखनाथ पवार,महेश पवार तसेच व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सत्यवान पाटेकर यांच्या प्रमुख



उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक प्रसाद काकिर्डे यांनी तर प्रास्ताविक मुख्याध्यापक जयेश तेलंग यांनी केले.

संस्थापक मानाजी धावले यांनी आपल्या मनोगतात शिक्षणाशिवाय पर्याय नाही आणि त्यासाठी कठोर परिश्रम करा.. असे विद्यार्थ्यांना आवाहन केले.. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आपल्या मिळकतीचा काही भाग शैक्षणिक साहित्याच्या स्वरूपात गेली अनेक वर्षे माना दास कॅश काऊ फिन्सर्व्ह प्रा. लि. देऊ करत आहे. या बद्दल कोळंबवाशीयांनी संस्थेचे कौतुक केले. यावेळी उपाध्यक्षा सुप्रिया पाटेकर , सुनिता कांबळे,स्वप्नाली पाटेकर, समीक्षा पाटेकर, संचिता पाटेकर,आसावरी माने, वैदेही पाटेकर,नीता तोरसकर, सपना कांबळे, मनिषा पाटेकर, पाडिलकर तसेच शिक्षक विजयकुमार माने, प्रणाली मोरे व बहुसंख्य पालक उपस्थित होते.
कोळंबचे ग्रामस्थ व पालकवर्गातून या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

## शेतकरी बालाजी तिम्मापुरे यांनी पेरलेले ईगल कंपनीचे 9305 जातीचे सोयाबीन उगवलेच नाही..

### तिमापुरे यांची प्रशासनाकडे तक्रार

### कृषी विभागाच्या गुणनियंत्रण कक्षा मार्फत शहरातील कृषी दुकानातील बियाणांची चौकशी करण्यात यावी..

**दैनिक युवक आधार**
**हिमायतनगर ता.प्रतिनीधी/**
**माधव काईतवाड बोरगडीकर**
हिमायतनगर येथील शेतकरी बालाजी तिमापुरे यांना त्यांच्या शेतात पेरलेल्या सोयाबीनच्या बियाण्यामुळे मोठ्या आर्थिक फटक्याचा सामना करावा लागत आहे. त्यांनी पळशीकर ट्रेडिंग कंपनी येथून ईगल ९३०५ या कंपनीचे १८ बॅग सोयाबीन बियाणे खरेदी करून जून महिन्याच्या सुरुवातीस पेरणी केली होती. समाधानकारक पावसामुळे पेरणी योग्य वेळी झाली.
असे असतानाही आजपर्यंत शेतात सोयाबीन उगवलेच नाही, असा गंभीर आरोप तिमापुरे यांनी केला आहे. या संदर्भात त्यांनी हिमायतनगर तहशीलदार, कृषि अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना लेखी निवेदन दिले असून, संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्या शेतात भेट देऊन बियाणे उगवले नाही याची चौकशी करावी आणि न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. निवेदनात त्यांनी बियाणे खरेदीची पावती क्र. १८५ देखील नमूद केली आहे. या प्रकरणामुळे तालुक्यातील शेतकरी वर्गामध्ये चिंता व्यक्त होत असून, निकृष्ट बियाणेमुळे होणारे नुकसान थांबवण्यासाठी प्रशासन काय पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळावा, अशी मागणी आता ग्रामस्थ आणि शेतकरी संघटनांकडूनही होऊ लागली आहे.

## भाताण बोगद्यात पोलिसांच्या वाहनांचा अपघात, अठरा पोलीस, बारा बांगलादेशी जखमी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**



भाताण बोगद्यात 18 जून रोजी सकाळी पोलिसांच्या वाहनांचा अपघात झाला असून यात 18 पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. त्यांच्यावर एमजीएम रुग्णालय कामोठेत उपचार सुरू आहेत. मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर सकाळी एक अपघात झाला होता. त्यावेळी मदतीचे काम सुरू होते. याच दरम्यान पोलिसांचा ताफा आरोपी बांगलादेशी नागरिकांना घेऊन पुणे येथे जात होते. या पोलिसांच्या ताफ्यातील वाहनाने ब्रेक दाबल्याने एका पाठोपाठ एक तीन ते चार गाड्या एकमेकांवर धडकल्या आणि मोठा अपघात झाला. या अपघातात 18 पोलीस जखमी झाले आहेत. तर 12 बांगलादेशी नागरिक देखील जखमी झाले आहेत. त्यांच्यावर एमजीएम रुग्णालय कामोठे येथे उपचार सुरू आहेत. या अपघाताची माहिती मिळताच पोलीस आयुक्त, पोलीस उपायुक्त परिमंडळ 2 यांच्यासह अनेक पोलीस अधिकारी घटनास्थळी तसेच एमजीएम रुग्णालय कामोठे येथे दाखल झाले होते.





## शालेय पूर्वतयारी मेळावा जि. प. प्रा. शाळा निवळी मोठ्या उत्साहात साजरा


**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**
नांदेड - मुखेड निवळी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथील दि. 16/6/2025 शाळेच्या पहिल्या दिवशी वर्ग 1 पहिली मध्ये येणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे व विद्यार्थीनीचे स्वागत करण्यात आले आहे व शाळेच्या प्रांगणात रांगोळी घालूण आज शाळा अतीशय सुंदर असी सजवून विद्यार्थी वेगवेगळ्या गणवेश मध्ये सजवून पाठ्य पुस्तक देऊन त्यांचा वर्ग पहिली मध्ये प्रवेश सोहळा करण्यात आला आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या व पालक यांच्या हातून वृक्षारोपण करण्यात आले
जि. प. प्रा. शाळेचे मुख्याध्यापक कदम सर माकणीकर, व शिक्षिका शालू ताई राठोड, यांच्या कडून विद्यार्थ्यांच्या पालकांन व मातेचा व गावातील लोक प्रतिनिधी यांचा सत्कार करण्यात आला आहे शा. व्यवस्था समीती अध्यक्ष बालाजी पाटील, सरपंच शिवसाब आप्पा मठपती, उपसरपंच संभाजी पाटील माळेगावे, सोसायटी चेअरमन भास्करराव पाटील नेवळे,निवळी ग्रामपंचायत सदस्य वैजनाथ कांबळे, राजू दहि कांबळे, अंगणवाडी सेविका महानंदा ताई नेवळे, सेविका सारीखा ताई टोपे, सखुबाई काटेवाडे, आशा वर्कर्स शोभाताई चव्हाण,उपस्थितीत सर्व गावकरी





## जगद्गुरु तुकाराम महाराज यांची पालखी देहू गावातून प्रस्थान

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**
दरवर्षीप्रमाणे आज जगद्गुरु तुकाराम महाराज यांची पालखी देहू गावातून पंढरपुराकडे प्रस्थान झाली. महाराष्ट्रातील अत्यंत पवित्र व भक्ति पूर्ण धार्मिक उत्सव आहे. १७व्या शतकात पालखीची परंपरा त्यांच्या वंशजाने परंपरा सुरू केली. या पालखीत लाखो भाविक संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सहभाग घेतात. देहू ते पंढरपूर असा २१० किलोमीटरचा पालखी सोहळा किमान २१ ते २२ दिवस चालतो. गावा गावातून दिंड्या



यामध्ये सहभागी होतात. देहू, आळंदी, पुणे ,सासवड ,बारामती ,वडी , निरा ,मलवडी ,अकलूज,वाखरी आणि शेवटी पंढरपूर असा पालखीचा प्रवास असतो. या वारीत निस्वार्थ, सेवा, भक्ती भाव, आणि शिस्त पद्धतीचे दर्शन होते. जगद्गुरु तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात पादुका ठेवून टाळ, मृदंग, अभंग, किर्तन करत पुण्याकडे प्रस्थान होते. या मुख्य कार्यक्रमात पूजा, अभिषेक, करूनच पालखी प्रस्थान केली जाते. या भक्तमय वातावरणात लाखो भाविक सामील होतात. या पालखी सोहळ्यात वैशिष्ट्य म्हणजे पांढरे धोतर, भगवा झेंडा, फेटा, परिधान केलेले असते. या पालखीत टाळ्या मृदंगाच्या गजरात *पंढरीनाथाची वाट पाहू*,*विठोबा माऊली तुकाराम* जयघोष करीत भाविक दिंडी सोहळ्यात सहभागी होतात. यावर्षी तुकाराम महाराज पालखी १८ जून रोजी सकाळी प्रस्थान पूजा पाठ करून प्रस्थान करण्यात या पालखी सोहळ्यात ४०० पोलिस,५०० दिंडी आणि सीसीटीव्ही कॅमेरे तैनात केले होते. या पालखीमध्ये जनरेटर, रुग्णवाहिका, आरोग्य सेविका, पोलीस कंट्रोल रूम व्यवस्था केलेली होती.

## यवतमाळमध्ये काँग्रेसची निवडणूक आढावा बैठक उत्साहात पार पडली

### कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती; निष्ठावंतांच्या पाठिशी काँग्रेसचा ठाम निर्धार

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी**
**:-जितेंद्र खोडे**
यवतमाळ:-जिल्हा परिषद,पंचायत समिती व नगरपरिषदेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाच्या वतीने भव्य आढावा बैठक आज यवतमाळ येथील सेलिब्रेशन हॉल,मेडिकल चौक येथे आज दिनांक १७ जून (मंगळवार) रोजी उत्साहात पार पडली.या बैठकीला जिल्हाभरातून कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. संपूर्ण हॉल कार्यकर्त्यांनी गजबजलेला होता, ज्यातून पक्षाच्या संघटनात्मक ताकदीचा प्रत्यय आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते,माजी प्रांताध्यक्ष माणिकराव ठाकरे होते.प्रमुख पाहुणे म्हणून आर्णी-वणी-चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रतिभाताई धानोरकर,माजी सामाजिक न्याय मंत्री शिवाजीराव मोघे,माजी शिक्षण मंत्री वसंतराव पुरके,माजी आमदार वामनराव कासावार,राजीव गांधी पंचायत राज संघटनेचे प्रदेशाध्यक्ष संजय ठाकरे, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष प्रफुल मानकर,मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक मनीष पाटील,ॲड.जयसिंग चव्हाण,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रवी ढोक,तालुका काँग्रेस अध्यक्ष रमेश भीसणकर,युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष प्रमोद बगाडे,सोशल मीडिया काँग्रेस जिल्हाध्यक्ष कृष्णा पुसनाके,तसेच उत्तमराव खंदारे,संतोष बोरले,सिकंदर शाह,कौस्तुभ शिर्के,निरीक्षक अरुण राऊत,प्रदीप वादाफळे,ॲड. सीमा तेलंगे,गटनेत्या स्वाती येंडे,अरिज बेग,समीना शेख,वैशाली सवाई,उषा दिवटे,विद्या परचाके,विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष विक्की राऊत यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.या बैठकीत बोलताना खासदार प्रतिभाताई धानोरकर यांनी सांगितले की, "पक्षाच्या संघर्षाच्या काळात निष्ठा राखणाऱ्या कार्यकर्त्यांच्या पाठीशी काँग्रेस पक्ष खंबीरपणे उभा राहील आणि त्यांच्यावर विश्वास ठेवेल."आमदार बाळासाहेब मांगूळकर यांनी प्रास्ताविक भाषणात स्पष्टपणे सांगितले की,"पक्षाशी एकनिष्ठ नसलेल्या कोणत्याही कार्यकर्त्याला पक्षात स्थान राहणार नाही. शिस्त आणि निष्ठा हे काँग्रेसचे मूलभूत मूल्य आहेत." शिवाजीराव मोघे आणि वसंतराव पुरके यांनीदेखील संघटनात्मक बांधिलकी आणि गावपातळीवरील सक्रियतेचे महत्त्व अधोरेखित केले.त्यांनी सांगितले की, "काँग्रेस पक्षाचा पाया तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये आहे.आगामी निवडणुका विचार,चळवळ आणि संघटनेच्या ताकदीने लढायच्या आहेत."कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात माणिकराव ठाकरे यांनी सांगितले की, "सध्याच्या राजकारणात वैचारिक अधःपतन आणि जनतेच्या मुद्द्यांपासून झालेल्या दूराव्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने पुन्हा नव्याने जागृत व्हायला हवे. येणाऱ्या निवडणुकांमध्ये पक्षाचे एकनिष्ठ कार्यकर्तेच विजयाचे शिल्पकार असतील. काँग्रेसची ताकद ही मतदारांमध्ये नव्हे,तर निष्ठावान कार्यकर्त्यांमध्ये आहे.संघटनातली शिस्त आणि विचारधारा ही आपल्या लढाईची शस्त्रं आहेत." कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यवतमाळ शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा.डॉ.बबलू उर्फ अनिल देशमुख यांनी केले,तर आभार रमेश भीसणकर यांनी मानले.या बैठकीने जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक तयारीला बळ दिले असून,कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. संपूर्ण कार्यक्रम यशस्वीपणे पार पडल्याने आगामी निवडणुकांसाठी काँग्रेस पक्ष सज्ज झाल्याचे चित्र स्पष्ट झाले.

## .. नळदुर्ग मध्ये ही शिवसेना - मनसे कार्यकर्त्यांचे मनोमिलन वाढदिवसानिमित्त एकत्र कार्यक्रम..

**दैनिक युवक आधार -**
**-संतोष पुदाले**
**तुळजापूर धाराशिव**
नळदुर्ग येथे दि.१३ जून रोजी शिवसेनेचे माजी मंत्री आदित्यजी ठाकरे साहेब यांचे वाढदिवस बाळासाहेब ठाकरे चौकात भगव ध्वज फडकून साजरा करण्यात आले व तसेच दि.१४ जून रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे व तसेच धाराशिव जिल्ह्याचे शिवसेना माजी उपजिल्हाप्रमुख श्री. कमलाकर चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना व मनसे कार्यकर्ते एकत्र येऊन उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना फळे व बिस्किट वाटप करत वृक्षारोपण केले आहे सध्या महाराष्ट्रात ठाकरे बंधू एकत्र येतील अशा चर्चा असताना अनेक ठिकाणी दोन्ही हि पक्षाचे कार्यकर्ते उत्साहाने गाठीभेटी घेत आहेत ठाकरे ब्रँड ची ही युती झाली तर महाराष्ट्रात मोठी ताकद निर्माण होणार आहे आणि भ्रष्ट सरकार संपणार मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी व महाराष्ट्राच्या हितासाठी ठाकरे बंधूंनी एकत्र यावे अशी सर्वांची भावना आहे त्यामुळे दोन्हीही बाजूचे कार्यकर्ते सकारात्मक होऊन उत्साही दिसत आहेत नळदुर्ग मध्येही शिवसेना-मनसे एकत्र कट आउट वर (बॅनर) वर पाहायला मिळाली आदित्यजी ठाकरे राजसाहेब ठाकरे माजी नगरसेवक कमलाकर चव्हाण यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमातून एकत्रपणे साजरा केला व कार्यकर्त्यांनी आता महाराष्ट्रात ठाकरे ब्रँड च चालणार अशा आशाची फलक नळदूमध्ये या नेत्यांना शुभेच्छा देण्यासाठी लावले आहेत यावेळी माजी नगरसेवक कमलाकर चव्हाण मनसेचे जिल्हा सचिव जोतिबा येडगे शिवसेना








उपतालुकाप्रमुख सरदार सिंग ठाकूर नळदुर्ग शहर प्रमुख संतोष पुदाले मनसेचे शहराध्यक्ष अलिम शेख शहर सरचिटणीस प्रमोद कुलकर्णी शिवसेना उपशहरप्रमुख शाम कनकधर नेताजी महाबोले मनसेचे गणेश बिराजदार सोमेश्वर आलूरे दगडू लकडे विजय माने अंकुश मातोळकर शुभम मोकाशे यांच्यासह दोन्ही हि पक्षाचे कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते